# संस्काराचे मोती

## राजेंद्र शेळके



**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# संस्काराचे मोती

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**मग**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संस्काराचे मोती

लेखक

राजेंद्र प्रल्हाद शेळके

# संस्काराचे मोती

## लेखक... राजेंद्र प्रल्हाद शेळके

पत्ता:- मु. पो. किनगाव राजा ता. सिंदखेड राजा
जि. बुलढाणा पिन 443203
मोबाईल क्रमांक 9823425852
इ-मेल rajendrashelke2018@gmail.com
ब्लॉग http://rpshelke.blogspot.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

**प्रकाशन : २८ नोव्हेंबर २०२०**

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य- प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे.

# • अल्प परिचय •

नावः- राजेंद्र प्रल्हाद शेळके

पत्ताः- मु. पो. किनगाव राजा ता. सिंदखेड राजा

जि. बुलढाणा पिन 443203

मोबाईल क्रमाांक 9823425852

इ-मेल rajendrashelke2018@gmail.com

ब्लॉग http://rpshelke.blogspot.com

शिक्षणः- बी. ए. डी. एड, बी. एड,

एम. ए ( समाजशास्त्र ), एम. ए ( मराठी )

व्यवसायः- प्राथमिक शिक्षक

जि प प्रा शा एरंडवडगाव

केंद्र पिंपळवाडी ता. जि. जालना

छंदः- वाचन, लेखन करणे. ( कविता, लेख, लघुकथा )

# ✍ लेखकाचे मनोगत ✍



सर्व वाचकांना नमस्कार

मी राजेंद्र प्रल्हाद शेळके व्यवसायाने प्राथमिक शिक्षक आहे. शिकणे व शिकविणे या क्रिया करत करत लिहीण्याचाही छंद जोपासत असतो. वेगवेगळ्या वर्तमानपत्रांतून कविता, लेख, कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. या अगोदर ई साहित्य प्रतिष्ठान कडून प्रकाशित झालेल्या **विचारांची श्रीमंती** ह्या पुस्तकाला वाचकांनी भरभरून प्रेम दिले. वाचकांच्या प्रेमाने लेखणीच्या पंखाना खुप सारे बळ मिळाले. मी वाचकांना मनापासून धन्यवाद देतो.

**संस्काराचे मोती** हा कथासंग्रह वाचकांच्या हाती देतांना मला अत्यंत आनंद होत आहे. परीस्थिती, संस्कार, शिक्षण, विचार, आचार या गोष्टी माणसाला जन्मतः मिळत नाही. तर त्या सभोवतालच्या परिसरातून व अनुभवातून मिळत असतात.

मनुष्य बाह्य अलंकाराने जेवढा सुशोभित दिसतो. त्यापेक्षा अधिक अतंर्गत विचारांनी, संस्कारांनी उठुन दिसतो. **संस्काराचे मोती** या कथासंग्रहातील कथा अशाच प्रकारे संस्कारांनी, विचारांनी, परिस्थितीनं, विश्वासानं बहरलेल्या आहेत. निश्चितच वाचकांना या कथासंग्रहातुन बोध मिळेल. वाचकांना ह्या कथा वाचतांना स्वतःच्या जिवनातील अनेक पैलूंची आठवण आल्या शिवाय राहणार नाही. वाचकांनी आपला अभिप्राय अवश्य कळवावा.

राजेंद्र प्रल्हाद शेळके

9823425852

# ✍ प्रस्तावना ✍

श्री राजेंद्र शेळके यांचा **संस्काराचे मोती** हा कथासंग्रह प्रसिद्ध होत आहे. श्री राजेंद्र शेळके यांनी अत्यंत संवेदनशीलपणे घेतलेल्या अनुभवांना शब्दबद्ध केलेले आहे. या कथांमधील अनुभवविश्व अत्यंत वास्तवदर्शी असे आहे. त्यांच्या कथा वाचतांना प्रसिद्ध कथालेखक श्री शंकर पाटलांच्या ग्रामीण कथांची प्रकर्षाने आठवण येते. **संस्काराचे मोती** या कथासंग्रहातील **अमावस्येची रात्र** ही कथा वाचतांना खेड्यापाड्यातील भुतांची भीती तरल मनावर हरवून जाते. पाटलांचा वाडा, रामुकाका हे स्थान आणि व्यक्ती मनात घर करून बसतात. **झोका** या कथेत ग्रामीण जनजीवन साक्षात वाचकांना आपल्या बालपणीच्या अनुभवाची पुनरप्रचिती देते. एकंदरीत यातील **यमुना, पोळा, अव्यक्त प्रेम, पाऊलवाट, संस्काराचे मोती, यात्रा** या कथा वाचतांना लेखकाच्या समृद्ध अनुभव विश्वाचा प्रत्यय येतो. श्री राजेंद्र शेळके हे माझे डी. एड पदविका वर्गात शिकतांनाचे विद्यार्थी आहेत. लेकराचे पाय पाळण्यात दिसतात याचा प्रत्यय वेळोवेळी त्यावेळी दिसून येत

होता. त्यांची सहज अभिव्यक्ती देखील वर्गातील सर्व विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेत असे.

श्री राजेंद्र शेळके यांची समृद्ध भाषा शैली, अनुभवांची श्रीमंती आणि जगाकडे पाहण्याची संवेदना विलक्षण प्रेरणादायी अशीच आहे. त्यांना लाभलेली वाङ्मयीन प्रतिभा त्यांना महाराष्ट्रातील एक ख्यातनाम साहित्यिक म्हणून भविष्यात उदयाला आणेल याची मला शाश्वती वाटते. मी त्यांची आचार्य म्हणून त्यांना आशीर्वाद देते. शिक्षकांनी साहित्यिक असणे ही शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्तम गुणवत्ता निर्माणाची गुरुकिल्ली आहे. असा शिक्षक अध्यापनाचे सोनं करतो. केवळ भाषा अध्यापनात नाही तर, इतिहासात कथाकथन, भूगोलात प्रवास वर्णन, सामाजिक शास्त्रात नाट्यीकरण अशा अप्रतिम अध्यापन प्रणाली आणि ज्ञानरचनावादाच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता सर्वोत्तम निर्माणात असा शिक्षक अतुलनीय कार्य सिद्ध करतो. कविता, कथा आणि भाषा पाठ्यपुस्तकातील भाव अध्यापन करतांना शिक्षक आणि विद्यार्थी एकरूप होतात.

श्री राजेंद्र शेळके हे माझे विद्यार्थी साहित्यिक शिक्षक असेच एक कुशल अध्यापक आहेत. जसा कुशल अध्यापक आहे तसा अजूनही शिकत असणारा एक आदर्श विद्यार्थी आहे. श्री

राजेंद्र शेळके यांनी या साहित्यिक प्रतिभेच्या बळावर डी. एड, बी. ए, बी. एड, एम. ए समाजशास्त्र, एम. ए मराठी, डी.एस.एम (शालेय व्यवस्थापन) या सर्वोत्तम शैक्षणिक पदव्या प्राप्त केल्या आहेत. त्यांना **संस्काराचे मोती** या कथासंग्रहासाठी मी शुभकामना देते. भविष्यात त्यांनी साहित्याची सर्व क्षेत्रे समर्थपणे हाताळून मराठी भाषेला समृद्ध करण्यासाठी आपली प्रतिभा प्रज्वलित करावी. श्री राजेंद्र शेळके यांच्या अनुपम साहित्यकृतीला शुभकामना देतांना त्यांची अध्यापिका म्हणून मला आनंद अनुभूतीचा प्रत्यय येत आहे. मी श्री राजेंद्र शेळके या माझ्या प्रतिभाशाली साहित्यिक विद्यार्थ्यांच्या **संस्काराचे मोती** या कथासंग्रहास शुभेच्छा आणि साहित्य, शिक्षण आणि वैचारिक क्षेत्रातील त्यांच्या उत्कर्षासाठी आशीर्वाद देते.

श्रीमती डॉ भारती तेलंग (शंखदरवार)

अधिव्याख्याता

DIECPD वर्धा

# • अर्पण पत्रिका •

जन्मापासून ज्यांनी फक्त कष्टांचा वसा घेतला
ते माझे दैवत आई वडील.



श्री. प्रल्हाद रामभाऊ शेळके
सौ. शोभा प्रल्हाद शेळके
माझे दुसरे पुस्तक आपणास अर्पण करतो.

या कथांमधील सर्व पात्रे घटना काल्पनिक आहेत जर चुकून याचा कुठे संबंध आलाच तर तो निव्वळ योगायोग समजावा. यात कुणाच्या भावना दुखावण्याचा कोणताही उद्देश नाही.

# • अनुक्रमणिका •

1. झोका

2. अमावस्येची रात्र

3. यमुना

4. पोळा

5. अव्यक्त प्रेम

6. पाऊलवाट

7. संस्काराचे मोती

8. यात्रा

एक

# झोका



नागपंचमी जवळ आली होती .या वर्षी सर्वांच्या आधी, सर्वात मोठा असा झोका माझा असावा असे मी मनाशी ठरवले होते. काही झाले तरी झोका मात्र बांधून घ्यायचाच असा निर्धार करूनच टाकला होता. दरवर्षी नागपंचमीला सर्व मित्रांचे वडील झोके बांधून देतात. पोरं दिवसभर मटकत मटकत झोका खेळतात. एखाद्याच्या झोक्यावर चढले तर तो लगेच ओरडतो...! उतर रे...! माझ्या झोक्यावरून मला खेळायचा

आहे. त्यामुळे मनसोक्त झोका खेळता येत नाही. अरे शाम आमच्या घरी झोक्यासाठी लागणारी मोठी दोरी नव्हती ना...! म्हणून माझे बाबा झोका बांधून देत नसावे.

''आमच्या घरी तरी कुठे मोठी दोरी असते.'' श्याम म्हणाला, पण माझे अण्णा आमच्या काकाच्या शेतातून दोरी आणतात व मला झोका बांधून देतात. मी मनातल्या मनात विचार केला. शामचे बाबा किती चांगले आहे ना...! त्याला प्रत्येक गोष्ट लगेच मिळते. मला मात्र प्रत्येक वेळी खुप रडावे लागते. तेव्हा माझे बाबा मला एखादी गोष्ट देतात. शरद मधेच बोलला, '' अरे तू एकटा आहेस ना '' ! म्हणून तुझे बाबा तुझी जास्त काळजी करतात. ही तर चांगलीच गोष्ट आहे ना...! अरे पण मी एकटा असलो म्हणून काय घरातच बसून राहायचे का? मलाही तुमच्या सोबत खूप खेळावे वाटते. मधेच शाम म्हणाला, '' अरे चला आता शाळेची वेळ झाली '' नागपंचमीला अजून वेळ आहे. आता शाळेत जायला उशीर झाला तर गुरुजी आपल्या हातावर झोका काढतील. शरद, शाम व मी मोठ्यामोठ्याने हसतच आपापल्या घराकडे दप्तर घेण्यासाठी पळालो.

शाळेत दिवसभर वेळ कुठे जात होता हे कळतच नव्हते. शाळेतली मजा म्हणजे अभ्यास नाही केला की गुरुजी खूप मारायचे. आज गुरुजी वर्गात येताच सगळे मुलं उभे राहिले. नमस्ते गुरुजी...! गुरुजींनी मुलांना नमस्ते म्हणून वर्गात एक नजर फिरविली व खाली बसा असा इशारा केला. गुरुजींनी वर्गात नजर फिरवून लगेच विचारले. एक जण कमी आहे. कोण बरे...! आले नाही. हां...! तो माधव दिसत नाही. कुठे गेला आज तो? सर तो झोका खेळत आहे. हळूच वर्गातील मनीषा म्हणाली...! झोका खेळत आहे? आता मध्येच झोका कसं काय? सर एकदम चिडुन बोलत होते. वर्गात एकदम शांतता पसरली होती. सरांच्या भितीमुळे सगळी मुलं एगदम चुप बसली. मनीषा घाबरत घाबरत उभी राहुन बोलु लागली. ‘‘ सर नागपंचमी आली ना जवळ म्हणून त्यांने चिंचेच्या झाडाला मोठा झोका बांधला आहे. ’’ आज सकाळी तो झोकाच खेळत होता सर...! नागपंचमीला तर अजून पाच दिवस वेळ आहे. हे पाच दिवस झोका खेळत राहिला तर किती अभ्यास बुडेल त्याचा, अशाने तो नापास होईल. एक लक्षात ठेवा, वर्गातील एकाही मुलाने यावर्षी झोका बांधायचा नाही व झोका खेळण्यासाठी घरी राहायचे नाही. जर का एखाद्या मुलाने झोका बांधला, तर त्याला मी वर्गात बसू देणार नाही. त्यांनी मग सरळ

पालकांना घेऊन मुख्याध्यापक सरांना भेटायचे व त्यांची परवानगी घेऊनच वर्गात बसायचे. सरांचे हे शब्द माझ्या कानात अगदी खोलवर घुसले. कानात कोणीतरी उकळलेले गरम तेल ओतल्यासारखे झाले. मनात एकदम चीड आली. या वर्षीच सरला काय सुचले हे नवीन?...! झोका खेळायचे नाही. काहीही झाले तरी मी झोका बांधणारच व नागपंचमीच्या दिवशी दिवसभर झोका खेळणार...! म्हणजे खेळणारच...! हळूच सर माझ्या जवळ आले. पाठीत जोरात धपाटा टाकत म्हणाले, ‘‘ राजू तुझे लक्ष कुठे आहे? ’’ मी किती वेळ पासून बघतोय तुझे वर्गात लक्ष नाही. सरांचा जोरात पाठीवर पडलेल्या धपाट्याने पाठीवर एकदम मुंग्या आल्या. मी दचकून वर पाहिले. तर माझ्या जवळ सर उभे होते. मी स्वतःला सावरत म्हणालो, ‘‘लक्ष आहे सर माझे ’’ सर शिकवत फळ्याकडे निघून गेले. तेव्हा माझ्या लक्षात आले की, अरे आपण झोक्यातच रमलो. इकडे मात्र शिकवणे सुरू झाले. त्यादिवशी दिवसभर शाळेत मन लागले नाही. शाळा सुटली शाळेतून घरी येतांनाच ठरवले आज रात्री बाबांना झोक्याचे सांगून ठेवायचे. रात्र झाली आई-बाबा शेतातून घरी आले. मी आज शाळेचा अभ्यास पटकन संपवला. आईने स्वयंपाक करून जेवायला आवाज दिला. बाबा, मी व माझी छोटी बहिण शितली आम्ही जेवायला

बसलो. मी हळूच विषय काढला बाबा यावर्षी नागपंचमीला मला मोठा झोका बांधून द्या. बाबा जेवता जेवता म्हणाले बघू. नागपंचमीला आणखीन पाच दिवस बाकी आहे. ‘‘ झोका खेळून काय मोठा साहेब होतो? ’’ आता अभ्यासात दिवा लावा जरा. खेळणे कमी करा. सकाळी शाळेत जाण्याअगोदर, शाळेतून आल्यावर सारखा खेळत असतो. शितली सांगत होती दादा शाळेत पण खेळत राहतो. गरिबीची जाणीव ठेवा. असे झोके खेळत राहिला तर, आयुष्यभर गरिबीचा झोका झुलवत बसावे लागेल. आज आईने सुंदर बनवलेले जेवण मला कडू लागू लागले. मला शितलीचा प्रचंड राग आला होता. शहाणी सारखी मुलीसोबत चिपा खेळत असते. पण बाबाला मात्र माझे नाव सांगते. मी गपा गपा जेवण करून चटकन उठलो. हात धुऊन अंथरुणावर जाऊन पडलो. आई-बाबांची कुजबूज सुरू होती. यावर्षी नवीन दोरखंड आणला आहेस तर, द्या त्याला झोका बांधून खेळेल दोघेजण एक-दोन दिवस. सण म्हटलं की लेकरांचा नादच असतो. दोरखंड आणल्यापासून त्याचा माझ्यामागे सारखा पुंगा आहे. आई मला नागपंचमीला झोका बांधायचा आहे. बाबा आईवरच चिडले, तु विनाकारणच लाड करते म्हणूनच तो बिघडत चाललाय. गावातील पाटलाची पोरं कशी रात्रंण दिवस अभ्यास करत असतात. त्यांना नाही का?

खेळु वाटत. पण त्यांना शिकून खूप मोठं व्हायचंय व नोकरी मिळवायची आहे. आई वडीलांचे नाव रोशन करायचे आहे. ती मुलं कधीच खेळतांना दिसत नाही. आपला राजुचे अभ्यासापेक्षा खेळण्यातच जास्त लक्ष आहे. वरून तुझे असे खत पाणी घालणे सुरूच असते. कधीतरी मुलांना माझ्या माघारी समजव जरा. वेळोवेळी परिस्थीची जाणीव करुन देत जा...! आपण काही घरदांज श्रीमंत नाही. गरिबीने आपल्या आयुष्याचे वाटोळे केले. तसे आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये असे मला मनापासुन वाटते. आपल्या दोन्ही मुलांनी खूप शिकावे मोठी नोकरी मिळवावी. आपल्याला या गरीबीतून एकदाचे सोडवावे. समाजात आपले नाव मोठे करावे. असे मला नेहमी वाटते. म्हणून मुलांना सारखा ओरडत असतो. तुला काय वाटले? माझा मुलांमध्ये जीव नाही. मी त्यांचा बाप आहे. पण काय करणार परिस्थितीपुढे हतबल आहे. आई बाबांच्या कुजबुजीत मला कधी झोप लागली ते कळलेच नाही.

झोका व शाळा या दोघांच्या विचारा विचारात चार दिवस निघून गेले. शेवटी आज तो नागपंचमीचा दिवस उजाडला. आज शाळेला सुट्टी होती. गावातील जवळपास सगळ्याच मुलांनी झोके बांधले होते. सकाळी उठून अंघोळ करुन मी

झोका बांधण्यासाठी आईकडे हट्ट धरला. बाबा बाहेरून आले, मी लगेच हळूच घरात येऊन चुपचाप बसलो. आई म्हणाली, ‘‘ आज वर्षभराचा सण आहे. ’’ लेकरावर रागु नका. द्या त्यांना झोका बांधून दुपारपर्यंत खेळतील व मग सोडून घ्या. बाबा आईकडे रागाने बघतच उठले. व दोरखंड घेऊन म्हणाले चला रे...! तुम्हाला झोका बांधून देतो. आमच्या घराच्या बाजूलाच एक लिंबाचे मोठे झाड होते. त्या झाडाला अगोदरच दोन तीन जणांनी झोके सकाळीच बांधलेले होते. मुलं मस्त छान झोके खेळत होते. आमच्या शेजारचा तो बाळू त्याने तर खुपच उंच झोका चढवला होता. मी व शितली झाडाखाली चुपचाप उभे होतो. बाबां हळूच झाडावर चढले, एका छोट्याशा फांदीवर त्यांनी झोका बांधला. बाबा झाडाच्या खाली उतरून मला सांगतात. ‘‘ शितली ला पण खेळू दे रे ! आरामात खेळा ’’ नाहीतर झोक्यावरून पडसाल. असे सांगून बाबा घराकडे निघून गेले. शेवटी मला झोका बांधून दिला. या आनंदात मी उड्याच मारु लागलो. मी घाईघाईत झोक्यावर चढलो. खुप मोठ्यामोठ्याने झोका चढू लागलो. बाकीच्या मुलांपेक्षा माझा झोका उंच गेला पहिजे यासाठी माझी धडपड सुरु होती. मधेच शितली ओरडत होती. ‘‘ दादा मला खेळू दे ’’ , ‘‘ दादा मला खेळू दे ’’ मी थोड्यावेळाने झोक्या वरून खाली उतरलो व

शितलीला झोका खेळायला दिला. थोडावेळ शितली झोका खेळली. ती लहान असल्याने तिचा झोका उंच जात नव्हता. ती सारखी मला म्हणायची दादा...! मला झोका दे...! मी शितलीला जोर जोरात झोका देऊ लागलो. तिचा झोका थोडा उंच गेला की, ती लगेच ओरडत असे....! दादा...! बस...! मला भिती वाटते. थोडा वेळ शितलीने झोका खेळला. तिला भूक लागली म्हणून ती घरी निघून गेली. आता मी एकटाच बिंदास्त झोका चढू लागलो होतो. बाकीच्या पोरांन पेक्षा उंच गेला पाहिजे. यासाठी जोरजोरात झोका चढू लागलो. माझा झोका खूपच उंच जाऊ लागला होता. झोका उंच केल्यामुळे डोळे फिरु लागले. माझ्या डोक्यात मुंग्या आल्यासारखे झाले. मला घाम येऊ लागला. अचानक माझे डोळे लागले व दोरीवरून हात निसटला. मी जोरात खाली पडलो. पुढे काय झाले काहीच आठवत नाही.

जाग आली तेव्हा हात खूप दुखत होता. डोके जड पडल्यासारखे झाले होते. हळूच डोळे उघडले तेव्हा थोडे थोडे पुसट दिसत होते. मी झोपुन होतो. अंगावर शाल टाकून होती. आई माझ्या जवळ बसून रडत होती. एका हातात सलाईन सुरू होते. बाबा जवळच बसुन होते. आई पटकन जोरात

ओरडली...! माझ्या बाळाला जाग आली. बाबा उठून माझ्याजवळ आले. प्रेमाने डोक्यावरून हात फिरवत म्हणाले, ‘‘ बाळा काही होत नाही तुला काही त्रास होतोय का? ’’ मी हळूच म्हणालो, ‘‘ आई कुठे आहे आपण?’’ आई रडत...! रडत...! हळु आवाजात म्हणाली, आपण दवाखान्यात आहोत. तू झोक्यावरून पडला ना...! त्यामुळे तुझा हात मोडला व डोक्याला पण मार लागला आहे. ‘‘ कशाला एवढा उंच झोका चढवत होता. ’’ अरे बापरे...! आपण पडलो की काय ? कसे...! कधी...! मला कसे कळाले नाही. माझा हात बापरे...! आता कधी नीट होईल. शितली हळूच म्हणाली ‘‘ दादा खुप त्रास होतो का रे! ’’ कसा काय पडला. शितली माझ्यापेक्षा छोटी असून सुद्धा खूप समजदार होती. माझ्या प्रत्येक हट्टापुढे तिलाच माघार घ्यावी लागत होती. तिच्या समजदार पणा मुळे ती लवकर घरी गेली. मी मात्र झोका खेळतच राहिलो. ‘‘ कळले का तुला तुझे बाबा का झोका बांधून देत नव्हते दरवर्षी ते ’’ आई हळूच म्हणाली. आईच्या डोळयातील पाणी व बाबांच्या चेहऱ्यावरची चिंता मला माझ्या मनातील अनेक प्रश्नांची उत्तरे देऊन गेली. मी ठरवले यापुढे आयुष्यात झोका खेळायचा नाही. कोणत्याच गोष्टीचा हट्ट करायचा नाही. यापुढे

खूप अभ्यास करून प्रगतीचा उंच झोका खूप चढवायचा. ज्याने माझ्या आई-बाबांना माझा अभिमान वाटेल.

# दोन

# अमावस्येची रात्र



अमावस्येची रात्र होती. बाहेर सर्वत्र काळाकुट्ट किर्र...! असा अंधार पडला होता. अंधारी रात्र समजून गावातील सर्व लोकं आपापल्या घरी शांतपणे झोपली होती. मी पण रात्रीचे जेवण लवकरच आटपून माझ्या खोलीत झोपण्यासाठी गेलो. घराच्या खिडकीतून बाहेर डोकावून पाहिले तर सर्वत्र किर्र...!

असा काळोखमय अंधार मला दिसला. तो अंधार पाहून मला वाटले रात्र खूप झाली. आता आपण सुद्धा झोपले पाहिजे. असे समजून मी माझे अंथरून टाकले व कंदिलाची वात कमी करून झोपण्यासाठी माझ्या अंथरूणावर जाऊन पडलो. पण मला झोप काही लागेणा. अंथरुणावर पडल्या पडल्या मी इकडच्या तिकडच्या अंगावर होऊ लागलो. तरीसुद्धा झोपेचा थांगपत्ता लागेणा. थोड्यावेळाने मला झोप लागल्यावाणी झाली. तोच अचानक बाहेरुन आवाज ऐकु आला. वाचवा...! वाचवा. ...! कुणीतरी मला वाचवा...! हा आवाज माझ्या कानावर येताच मी पटकन झोपेतून जागा झालो. पटकन अंगावरची रग बाजूला केली. जवळच असलेल्या कंदिलाची वात मोठी केली. ताटकन उठुन खिडकी उघडली. खिडकीतून बाहेर डोकावून पाहू लागलो. बाहेर अगोदरच अंधार होता. बाहेर कुणीच दिसत नाही म्हणजे आपल्याला नक्की भास झाला. असे समजुन मी पुन्हा माझ्या अंथरुणावर येऊन पडलो. थोड्यावेळाने परत वाचवा...! वाचवा...! कुणीतरी मला वाचवा...! असा आवाज आला. मी पटकन उठलो खिडकी उघडुन त्या अंधारात कोणी दिसते का ते बगु लागलो. आवाज कोणत्या दिशेने येत आहे याचा कानोसा घेऊ लागलो. पाहतो तर घराच्या पाठी मागच्या बाजूने आवाज येत होता. वाचवा...! वाचवा...! कुणीतरी मला

वाचवा...! हा आवाज ऐकून मला वाटले कोणीतरी एक स्त्री संकटात आहे. म्हणून गयावया करून मदतीसाठी ओरडत आहे. अचानक माझ्या मनात प्रश्न पडला ...! कोण असावी ही स्त्री? एवढ्या रात्री काय संकट आले असेल तिच्यावर, अशा विचारात असताना मी पटकन उठलो. घरातील कंदील हातात घेतला. पायात चपला घालून घराबाहेर पडलो. आवाजाच्या दिशेने झपाझपा चालू लागलो. चालत चालत मी घराच्या पाठीमागे पोहोचलो. माझ्या घराच्या पाठीमागे पडीत मोठा वाडा होता. तिथे खूप वर्षापासून कोणीच राहत नव्हते. मी त्या वाड्याच्या जवळ जाताच माझ्या हातातील कंदील विझला. वाचवा...! वाचवा...! कुणीतरी मला वाचवा...! असा येणारा आवाज काही क्षणातच बंद झाला. अचानक कंदील विझनं, आवाज बंद होणं. या सर्व गोष्टी अचानक कशा काय घडल्या. असा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. या सर्व गोष्टी अचानक घडणं हा काही योगायोग नव्हता. अशा विचारात असताना परत माझ्या लक्षात आले. आज तर अमावस्या आहे. अमावस्येला भुतकेत निघत असतात म्हणे. या सर्व विचारांच्या गोष्टींनी मी पुन्हा घाबरून गेलो. मला काहीच सुचेनासं झालं. तोच माझं लक्ष समोरच्या पडक्या वाड्याकडे गेले. अचानक माझ्या डोळयासमोर एक धष्टपुष्ट उंचच उंच अशी एक स्त्री

माझ्याकडे पाठ करून उभी असलेली मला दिसली. मी पाहतच राहीलो. तिचे लांबसडक केस, केसांची घातलेली वेणी अशी ती सुंदर स्त्री मला दिसली. अचानक माझ्या डोळ्यासमोरून नाहीशी झाली. तो येणारा आवाज सुद्धा नाहीसा झाला. हा सर्व प्रकार पाहून मी अतिशय घाबरलो. माझ्या संपूर्ण अंगाचा थरकाप होऊ लागला. मनात अनेक प्रश्नांचे काहूर उठले. काय करावे काही मला समजेनासे झाले. मी ताबडतोब तिथून निघालो. विझलेला कंदील लावण्यासाठी माझ्याकडे काहीच नव्हते. तसाच मी अंधारात रस्त्याने चालू लागलो. भूकंप झाल्या सारखी माझ्या पायाखालची जमीन हादरून गेली होती. माझे कपडे व अंग पावसात भिजल्यासारखं घामानं ओल झालं होतं. ऐवढी भीती मनात भरली होती. कसाबसा घरी परतलो. मी पटकन घर उघडले. घरात शिरलो व पहिली दरवाज्याची आतून कडी लावली. अंधारात चाचपडत आगपेटी शोधली. विझलेल्या कंदीलाची वात पेटवली व कंदील भिंतींच्या खुटींला लटकवला. पटकन एक पेला पाणी भरून घेतले घटाघटा पाणी पिऊन टाकले. अंथरुणावर येऊन निपचीत पडलो. एकदाचं श्वास घेतल्यावाणी मला झाले. अंथरुणावर येऊन पडलो होतो खरा पण मन मात्र दुसरीकडेच भटकत होते. घडलेल्या सर्व प्रकाराविषयी माझ्या मनात अनेक प्रश्न येत होते.

कोण असावी ती स्त्री? तिने कशापायी ओरडावे? बर मला एक समजत नाही मी त्या ठिकाणी गेल्यावर तिचं ओरडणं का थांबावं. मला फक्त ती पाटमोहरीच का दिसावी. तिचा चेहरा का दिसला नाही. ती खरीखुरी स्त्री होती का? की एखादी पडछाया. मनातील भितीमुळे मला भास झाला असेल का? ती स्त्री त्या ठिकाणी काय करत असावी. मला काहीच न बोलता ती तिथून नाहीशी होणं हा सर्व कसला प्रकार आहे. हे काही केल्या माझ्या लक्षातच येत नव्हतं. अशा विचारातच मला कधी झोप लागली हे कळलं सुद्धा नाही.

सकाळ झाली...! दिवस उगवला होता. दरवाजाच्या फटीतून सूर्यप्रकाशाचा उजेड आत आला होता. बाहेरच्या लोकांचा कल्ला कानावर येऊ लागला. तेव्हा मला जाग आली. दरवाजाच्या फटीतून सूर्यप्रकाशाचा आलेला उजेड पाहून माझ्या लक्षात आले की, दिवस उगवुन खूप वेळ झाला आहे. मी अंथरुणात पटकन उठून बसलो. डोळे चोळत चोळत माझ्या मनात विचार आला. हा सर्व घडलेला प्रकार आपण भावड्याला सांगायला हवा. भावड्या म्हणजे माझा लंगोटी मित्र ‘शरद.’ शरद हा शरद ऋतूप्रमाणेच भारी. पण जीवलग, विश्वासपात्र होता. मी पटकन उठलो आंघोळ केली चहा घेतला

व लगेच भावड्याच्या घराला जाण्यासाठी निघालो. घरी जात असताना परत माझ्या मनात विचार आला की, हा घडलेला सर्व प्रकार आपण शरदला सांगितल्यावर शरद आपल्याला कदाचित हसणार तर नाही ना...! किंवा शरदला हा सर्व प्रकार खोटा आहे असं तर वाटणार नाही ना...! अशा विचारात असतानाच शरद चे घर आले. मी घाईघाईने शरद च्या घरात शिरलो. घरात जातो तर शरद मला दिसेना. तोच मी पटकन शरद च्या आईला विचारले. ‘‘ काकू शरद घरी आहे का? ’’ हो आहे ना...! असे म्हणताच मी विचारले. कुठे आहे ? शरद ची आई म्हणाली ‘‘ त्याच्या खोलीत पेपर वाचत बसलाय ’’. मी पटकन त्याच्या खोलीत शिरलो. शरद पेपर वाचण्यात मग्न होता. मी शरदला म्हणालो चलं उठ आपण बाहेर जाऊ माझं तुझ्याशी काम आहे. हे ऐकून शरदचे माझ्याकडे लक्ष जाते. राजू केव्हा आलास...! व कुठे जायचे म्हणतोस? अरे खाली तर बस...! काय काम आहे ते तर सांग. मी त्याला म्हटले मी बसत नाही. तु आधी पटकन माझ्या सोबत चल मी काय काम आहे ते नंतर सांगतो. मी शरदला घेऊन लगबगीने माझ्या घरी आलो. मी घडलेला सर्व प्रकार शरदला सांगितला. तेव्हा शरद माझ्याकडे बघून मोठ्या मोठ्याने हसू लागला…! ‘‘ अरे स्वप्न पडले की काय तुला? ’’ मी शरदवर रागावलो. मला वाटलेच

होते ...! तु मला हसशील. हे तुला सर्व खोटं वाटेल. पण शरद तू माझ्यावर विश्वास ठेव हा घडलेला सर्व प्रकार खरा आहे. माझा घाबरलेला चेहरा पाहून शरदला खरे वाटले. तो म्हणाला ‘‘ राजू काळजी करू नकोस ! ’’ ती स्त्री कोण होती. का ओरडत होती. तो ओरडण्याचा आवाज खरच येत होत का?, की तो सर्व अभास होता. या सर्व गोष्टीचा आपण शोध लावू. तु आधी शांत हो. घाबरून नको जाऊ, मी आहे ना...! हे ऐकुन मी जरा निवांत झालो. आमच्या शेजारी एक वयस्कर रामुकाका राहतात. त्यांना या वाड्याबद्दल खूप माहिती आहे म्हणे. ते काही वर्षे पाटलाकडे सालगडी म्हणून काम करत होते. त्यांना सुद्धा असाच एक अनुभव आलेला आहे. माझे बाबा एकदा आईला सांगत होते. ते आपल्याला या बद्दल सर्व माहिती सांगतील. मी व शरद रामुकाकांच्या घरी गेलो. रामुकाका नुकतेच जेवून पानसुपारी खात बसले होते. वय खुप झाल्यामुळे त्यांना फारसे नीट ऐकू येत नव्हते. पण गावातील जुन्या सर्व गोष्टी रामुकाकांना चांगल्याच माहीत होत्या. त्यामुळे घडलेल्या प्रकाराबद्दल नक्कीच त्यांना काहीतरी माहिती असेल असे विचार माझ्या मनात घोळत होते. शरदने घडलेला सर्व प्रकार रामुकाकांना सांगितला. रामुकाका माझ्याकडे बघून बोलू लागले. तो गावच्या पाटलाचा वाडा होता. त्या वाड्यात पाटील व त्यांची

बायको राहत होती. पाटील गावात सर्वात श्रीमंत होते. शेतीबाडी, जनावरं, लय थाट होता त्या पाटलाचा. मी लय दिवस कामाला होतो पाटलाकडे...! पाटील स्वभावाने कडक माणुस...! अगदी कडक...! कुणाचीही दयामया करत नसत...! ‘‘ काम करी मिळे दाम ’’ असे पाटील नेहमी म्हणायचे. काम केल्याशिवाय दमडी हातावर देत नसत...! लय रुबाबात जगला हा माणुस...! पण नशिबापुढे हारला मात्र...! पाटलाला मूलबाळ नव्हते. म्हातारपणात आपल्याला आधार म्हणून त्यांनी त्यांच्या नातलगातील नवीनच लग्न झालेले एक नवरा बायकोचे जोडपे त्या वाड्यात राहण्यासाठी आणले होते. हे चौघेजण या वाड्यात राहु लागले. पाटील होते तोपर्यंत या वाड्याकडे वाकडी नजर करुन पहायची कुणाची हिंमत होत नव्हती. अचानक एके दिवशी पाटलाच्या बायकोला ताप आला. म्हातारी दोन चार दिवस तापाने फणफणली व पाचव्या दिवशी म्हातारीने जिव सोडुन दिला. बायकोच्या जाण्याने पाटील एकाकी पडले. पाटलांने एक महिन्यात देह सोडला. पाटील व त्यांच्या पत्नीचे निधन झाले. यामुळे सर्व गाव सुन्न झाले होते. शेवटी गावातील श्रीमंत माणूस गेला गावाचे वैभव गेले होते. पाटलाने जातांना या नवरा बायकोकडुन कायमचे वाड्यावर राहण्याचे वचन घेतले होते. त्यांच्या पश्चात या

वाड्याची जबाबदारी या जोडप्याकडे आली. खुप गर्भ श्रीमंत घराण्यातील होती ती दोघेही. त्यांच्याकडे खुप पैसा, सोने चांदीची दागीने होती. वरून पाटलाची सर्व संपत्ती ही आता त्यांच्याकडे आली होती. त्यामुळें ते गावात सर्वात श्रीमंत होते. हे जोडपं आनंदात जीवन जगत होते. एके दिवशी मात्र अमावस्येच्या रात्री त्यांच्या वाड्यावर चोरीच्या उद्देशाने दरोडेखोरांनी दरोडा टाकला. दरोडेखोर सोने, नाणे ,पैसा, लुटण्याचा प्रयत्न करु लागले. त्यावेळी त्या दाम्पत्यांनी दरोडेखोरांना विरोध केला. दरोडेखोरांच्या हातुन तो तरुण मारला गेला. आता त्या दरोडेखोरांनी त्या स्त्रीला सुद्धा मारायचे ठरवले. तेव्हा ती स्त्री ओरडली. वाचवा...! वाचवा...! कोणीतरी मला वाचवा...! असा आवाज करू लागली. शेवटी दरोडेखोरांनी तिला जीवे मारले. सर्व वाडा लुटुन ते दरोडेखोर पसार झाले. तेव्हापासून तो पाटलाचा वाडा बंदच आहे. गावातील कुणीच त्या वाड्याकडे फिरकत नाही. कधी कधी त्या स्त्रीचा आत्मा अमावास्येला त्या वाड्यात भटकत राहतो म्हणे. प्रत्यक्ष मात्र ती स्त्री कधी कुणाला दिसली नाही. मी मात्र पाटलाच्या आठवणीने कधी कधी जायचो त्या वाड्याकडे पण, मला एकदा त्या वाड्यावर असाच भास झाला. तेव्हापासून मी सुद्धा फिरकत नाही तिकडे...!

हे सर्व ऐकून मी व शरद रामुकाकाकडे बघतच राहिलो. मला मात्र ती स्त्री व तिचा आवाज, तिची दिसलेली प्रतिमा हा भास मनात भिती करुन केला.

# तिन

# यमुना



यमुना ! अग ये यमुना ! काय करतेस ग...! अगदी जोरा जोरात आवाज देऊन सुद्धा यमुनेने ओ दिली नाही. रोजच्याप्रमाणे मैत्रिणीसोबत यमुना अंगणात खेळण्यात गुंग होती. सकाळी दिवस उजाडल्यापासून तर सायंकाळी दिवस मावळेपर्यंत यमुना अख्ख्या वाड्यामध्ये सारखी मुलींसोबत खेळत असायची. आई बापाची लाडकी एकुलती एक मुलगी ती, जणू राजकन्याच होती. पाच भावंडात सर्वांत छोटी होती. सहाजिकच आई-वडील व चारही भावांनी ज्ञानदेवांच्या मुक्ताई प्रमाणे जीवापाड तिला जपले होते. एखाद्या राज्याच्या राजकन्ये प्रमाणेच तिचे बालपण गेले. बापाचा मोठा वाडा होता. घरात

अन्नधान्य, धनदौलत, पैसा आदला मुबलक होता. गावात तिच्या बापाला पाटला एवढाच मान होता. त्यामुळे यमुना ही सर्वांचीच आवडती गावातील सर्व बायका तिचा खूप लाड करायच्या. घरीदारी नुसता लाड...! अन लाडच...! सुरू होता. आईच्या व बापाच्या मायेने यमुना कधी मोठी झाली कळले सुद्धा नाही. यमुना उंचपुरी व धिप्पाड झाली होती. अगदी श्रावणाने जसा निसर्ग बहरून येतो. सगळीकडे हिरवी झालर पांघरली जाते. तसे यमुनेचे तारुण्य सौंदर्याने बहरून आले होते. अगदी कुणाचीही नजर लागावी अशी यमुना दिसत होती. यमुना आपल्या मैत्रिणी सोबत कधी वाड्यावर तर कधी मैत्रिणीच्या घरी जाऊन हसत, खेळत, गप्पागोष्टी मारत दिवस घालवत असे. अगदी आनंद व नवचैतन्य तिच्यात भरले होते. परंतु तिची आई मात्र चिंतेत होती. एके दिवशी यमुनेच्या आईने यमुनेला सांगितले, ‘‘ तू आता घराच्या बाहेर जास्त वेळ जात जाऊ नको ’’ आता तु मोठी झालीस...! लोकांची वाईट नजर तुझ्यावर पडू देऊ नको? लोक काही चांगले नाही. कोमल फुलासारख्या माझ्या मुलीवर कुणाची वाईट नजर पडली तर? नको...! नको...! तु बाहेर जात जाऊच नको. आपला वाडा काय कमी आहे का? हवे असल्यास तुझ्या मैत्रिणींना आपल्या वाड्यावर बोलून घेत जा ! ‘‘ यमुना मोठ मोठ्याने हसतच म्हणाली ’’ आई मी काय आता झोक्यातले छोटे बाळ आहे

का? मला हे सर्व सांगायला. मला कळते ग...! सर्वकाही. मी माझी काळजी घेते. तू नको जीवाला घोर लावून घेऊ...! तू रात्रंदिवस फक्त माझीच फिकीर करत असते ग...! तू तुझी पण काळजी करत जा.

एके दिवशी यमुनेच्या बाबाने यमुनेला जवळ बोलावून घेतले. ‘‘ यमुना आता मी तुझे लग्न करावे म्हणतोय ’’ आपल्या शेजारच्या गावात पाटलांची बहिण सुगंधा राहते. तिचा एकुलता एक मुलगा आहे. नाव त्याचे राजाराम ! घरी पन्नास एक्कर शेती आहे त्यांचा मोठा वाडा आहे. त्यांना गावात फार मान आहे. मोठा दबदबा आहे त्या घराण्याचा पंचक्रोशीत ! मुलगाही देखणा आहे. सुगंधा आता या जगात नसल्यामुळे पाटलाला राजारामची काळजी वाटते. मी पाटलाकडे अनेक वेळा बघितलेला आहे त्याला, पाटील हे माझे लहानपणापासूनचे मित्र. त्यांचे व आपले अगदी फार जुने संबंध आहे. माणसं अगदी प्रामाणिक विश्वासाची आहेत. पाटीलांनी ‘‘ कधी बोलावून घेऊ मुलाला, असे अनेकदा विचारले.’’ माझा विचार आहे परवा या म्हणून निरोप देतो त्यांना ! चालेल ना...! एवढ्या वेळ शांतपणे उभी असलेली

यमुना लाजतच बैठकीतून निघून गेली. तिच्या लाजण्यातच यमुनेचा होकार समजून आला होता.

आज सकाळपासून घरात धामधूम होती. पाहुणे येणार म्हणून घरातील सगळी माणसं...! नटुन थटुन घरातील कामे पटपट आवरत होती. एखाद्या सणाप्रमाणे घराला नवंरूप आलं होतं. घरातील बैठकीपासून ते बाहेरच्या अंगणापर्यंत सर्व घर स्वच्छ व सुंदर सजवलं होतं. सर्वजण आता पाहुणे येतील याची वाट पाहत होते. तेवढ्यात घरघडी बाहेरून जोरातच धावत आला. ‘‘ मालक मालक पाहुणे आले ’’ यमुनाचे बाबा, भाऊ, घरातील माणसं ! सर्वजण पाहुण्यांना घेण्यासाठी घराच्या बाहेर आले. राजाराम त्याचे वडील, काका असे सर्व पाहुण्यांना घेऊन पाटील दारावर आले. ‘‘ रामराम मंडळी ’’ असे जोरात पाटलाने म्हणताच, यमुनेच्या बाबाने आदराने वाकून रामराम घातला. या पाटील आमच्या वाड्यावर तुमच्या सर्वांचे स्वागत आहे. पाहुणे घरात आली चहापाणी झाला. गप्पा मारत मारत पाटलानी सर्वांची एकमेकांशी ओळख करून दिली. बोलता-बोलता बराच वेळ झाला होता. पाटील यमुनेच्या बाबाला म्हणतात, ‘‘ यमुनेला घ्या आता बोलावून ’’ यमुनेच्या बाबाने हाताने इशारा करताच धाकटा भाऊ पटकन उठला व घरात

गेला. ‘‘ यमुना चल लवकर ’’ तुला बाबांनी बैठकीत बोलावले. यमुना रोजच्या पेक्षा जास्तच नटुन होती. त्यामुळे अधिकच खुलून दिसत होती. तिच्या आईने तिला जायला इशारा केला यमुना आपल्या भावाच्या पाठीमागे निघाली. ऐरव्ही बैठकीत जाताना यमुना हसत हसत जायची. आज मात्र तिच्या चेहऱ्यावर थोडीशी भीती होती. सहाजिकच तिला पाहुणे बघायला आले होते. भावाच्या पाठीमागून यमुना बैठकीत आली. पाहुण्यांच्या समोर मधोमध चौरंग ठेवला होता. ‘‘ बस यमुना त्या चौरंगावर पाहुण्यांच्या समोर ’’ बाबा हळूच म्हणाले. यमुना चौरंगावर जाऊन बसली. पाहुण्यांनी यमुनाला नाव गाव, आवडी निवडी विचारल्या व येण्यास सांगितले. यमुना लाजतच बैठकीतून निघून गेली. पाहुण्यांना यमुना पसंत आली. यमुना व राजारामचे लग्न ठरले. एका महिन्यावर यमुनाच्या बाबांनी लग्नाची तारीख पक्की केली. यमुना व राजारामचे अतिशय धुमधडाक्यात लग्न लावले. सर्वांची लाडकी यमुना आता परक्या घरची धन झाली होती. माहेरवासीन सासरला निघून गेली.

राजारामच्या घरी यमुनेचे धुमधडाक्यात वाजत गाजत स्वागत झाले. तिने सासरचा उंबरठा ओलांडला व दारावरचे

माप ओलांडून यमुना घरात आली. सासर हेच आता यमुनेचे माहेर होते. सासु नसल्यामुळे घरात आल्यापासून यमुनेला राबावे लागणार होते. हळूहळू यमुनेच्या संसाराला सुरुवात झाली. बघता बघता यमुनेला चार मुली झाल्या. गंगा ! भागेरथी ! सावित्री ! गोदावरी ! त्यांचे नाव ठेवण्यात आले. गंगा, भागु, सावित्री, गोदा, यमुना, राजाराम व तिचे सासरे असा त्यांचा परिवार आनंदात राहत होता. एके दिवशी दुपारी अचानक यमुनेच्या बाबांच्या घरचा घरगडी दारात येऊन उभा राहतो व राजारामला बाहेर बोलावून निरोप देतो. यमुनेच्या आईला सर्पदंश झाला व त्यातच तिचे निधन झाले. यमुनेला डोंगराएवढे दुःख झाले. स्वतःची आई गेली या दुःखातून ती सावरते न सावरते ! तेच चार महिन्यांनी आईच्या दुःखाच्या धक्काने तिचे बाबाही वारले. जीवनातील दोन तेजस्वी सूर्य काळाने हिसकावून नेले होते. तिच्या जीवनातील अचानक मायेचा हा प्रकाश आटला होता. इकडे येमुनेच्या संसाराला कोणाची तरी नजर लागली असे झाले. राजाराम व यमुनेची एक सारखी कटकट होऊ लागली. राजारामला मुलगा हवा होता. तो यमुनेकडे मुलासाठी सारखा हट्ट धरू लागला. यमुना घरात राबराब राबत होती. मध्यंतरी सासऱ्याला अर्धांगवायूचा झटका आला. त्यामुळे एक हात व पाय लुळा पडला होता. त्या

दिवसापासून म्हातारा एकाच जागेवर पडून होता त्यामुळे म्हाताऱ्याचे सर्वकाही यमुनेलाच करावे लागत होते. मुलासाठी राजाराम खूप भांडण करू लागला. यमुनेच्या जीवनात एकामागून एक वाईट प्रसंग घडतच होते. तरीसुद्धा यमुना या प्रसंगांना कशीबशी सामोरे जात होती.

अशातच तिला दिवस गेले. आता तरी मुलगा होईल म्हणुन राजाराम यमुनेला बजावत होता. यमुने ! मला मुलगा पाहिजे ! मुलगी झाली तर? मी तुला या घरात ठेवणार नाही. दिवसभर घरकाम, म्हाताऱ्याची सेवा, चार पोरींचे आवरणे यातच यमुना फार थकून जात होती. वरून राजारामच्या धाकाने तिला एक वेळचे अन्नसुद्धा गोड लागत नव्हते. यमुनेचे दिवस भरत आले होते. राजाराम मुलासाठी अति उत्साही झाला होता. एके दिवशी सकाळी सकाळी यमुनेच्या पोटात दुखायला लागले. राजारामने पळत जाऊन गावातील दायनी मावशीला बोलावून आणले. थोड्या वेळातच यमुनेला गोंडस मुलगी झाली. राजारामला मुलगी झाली कळताच...! राजाराम प्रचंड संतापला. यमुनेवर राग राग करून बाहेर निघून गेला. मुलाच्या हव्यासाने हपापलेला राजाराम या वेळी फार संतापला होता. अतिशय रागाच्या भरात राजारामने आज चुकीचे पाऊल

उचलले होते. तो खूप दारू पिला होता. सायंकाळी राजाराम दारुच्या नशेतच घरी आला व खूप भांडण करू लागला. यमुनेला मारहाण केली. यमुना अतिशय दुःखी झाली. पण नशिबापुढे ती तरी काय करणार होती. राजाराम मुलाच्या हव्यासापायी रोजच दारू पिऊ लागला. घरात पैशाची चुणचुण भासू लागली. शेती विकून दारुत पैसे उडवणारा राजाराम व्यसनात पार धुंद झाला होता. एकेकाळी राजकन्ये सारखे वैभव भोगणारी यमुना आज मात्र परिस्थितीने नवऱ्याची गुलाम झाली होती. पाच पोरींचा बाप होऊन सुद्धा राजाराम मुलासाठी हपापलेलाच होता. यमुना मात्र पाच पोरींची आई व घरकाम याने फार अशक्त झाली होती. आता मरण आलेले बरे ! पण लेकरं नको ! अशी तिची मानसिकता झाली होती. पण नवऱ्याची गुलाम झालेली यमुना पुन्हा या मोहाला बळी पडली. यमुनाला सहाव्यांदा दिवस गेले. आतां तरी मुलगा होऊ दे ! नाहीतर मरण तरी दे ! असे यमुनेने देवाकडे साकडे घातले होते. उन्हाने हिरवी वेल सुकावी तशी यमुना यावेळी फार सुकून गेली होती. एका जागेवरून उठणे तिला जमेनासे झाले होते. मात्र राजाराम ठरल्याप्रमाणे दारू पिऊन घरी आला व जोर जोरात यमुने मुलगा ! यावेळेस मुलगा दे मला ! असे बडबडु लागला. दिवस मावळला होता बाहेर अंधार पडला होता. अचानक

यमुनेच्या पोटात दुखू लागले. यमुना वेदनेने विव्हळत होती. दुसरीकडे नशेत धुंद असणारा राजाराम मुलगा होतो की, मुलगी या विचारात मग्न होता. गंगाने भागेरथीला पाठवून गावातून दायनी मावशीला बोलावून घेतले. दायनी मावशी आली घराचा दरवाजा लावून पोरींना बाहेर पाठवले. यमुनेच्या आयुष्यात फक्त दुःख आणि वेदनाच भरल्या होत्या त्यामुळे तिला हे नवीन नव्हते. एकेकाळी सौंदर्याने बहरलेली यमुना आता मात्र अशक्त झाली होती. चाळणीसारखे तिचे शरीर खिळखिळे झाले होते. पाच पोरींची आई होऊन यमुनेचे शरीर हाडांचा सांगाडा झाले होते. नऊ महिने रोजच कटकट व मारहाण यामुळे यावेळेस यमुनेत प्राण उरला नव्हता. यावेळेस तरी मुलगा होईल या आशेवर यमुना कसीबसी धिर धरुन नऊ महीने बळकष्टीने जीवंत होती. या वेळेस तिला अशक्त पणामुळे बाळ पोटाच्या बाहेर ढकलणे सुद्धा जमेना. प्रंचड वेदनेने यमुना ओरडत होती. एक सारखी रडत होती. दायनी मावशी यमुनेला धीर देत होती. पोरी होईल तुझं चांगलं....! देव काही लय वाईट नाही. तुझ्या नशिबालाच काय हे कष्ट वाढुन ठेवलेत कुणास ठाऊक...! दायनी मवशीच्या आधाराने यमुनाला थोडा का होईना पण मायेचा आधार मिळत होता. थोड्या वेळातच बाळ रडण्याचा आवाज आला ! मावशीने दरवाजा उघडला.

बाळाला घेऊन राजारामच्या मांडीवर ठेवून म्हणाली मुलगा झाला तुला...! मुलगा...! झाली का? आता मनाची शांती ! राजाराम नशेतच उड्या मारू लागला. मुलगा झाला ! या राजारामला मुलगा झाला ! गंगा, भागु, सावित्री, गोदा, सिंधू बघा...! बघा...! तुम्हाला भाऊ झाला. बघताय काय? शेजारी पाजारी ओरडून सांगा. ‘‘ भाऊ झाला आम्हाला, भाऊ ’’ मुलाच्या आनंदाने राजाराम पार वेडा झाला होता. यमुना कुठय? ती कशी आहे. याकडे त्याचे लक्षच नव्हते. थोड्यावेळाने गंगा, भागु घरात आली. यमुना एका जागी शांत पडली होती. पोरींनी तिला आवाज दिला. आई...! ये आई...! मुलगा झाला तुला...! यमुना मात्र ओ देत नव्हती. पोरींनी आईला हलवले. आई काहीच हालचाल करत नाही म्हटल्यावर भागु जोरात ओरडली. बाबा...! आईला काय झाले बघा. सावित्री, गोदा, सिंधू पळतच घरात आल्या. राजाराम बाळाला घेऊन डोलत डोलतच घरात आला व यमुनेकडे बघून आवाज देऊ लागला. यमुना ! ये यमुना ! बग मुलगा झाला मला...! मुलगा...! यमुना मात्र आयुष्याच्या सर्व कष्टातून व राजारामाच्या त्रासातून सुटुन एकदाचीच...! कायमची झोपली होती. कधीही न उठण्यासाठी...!

# चार

# पोळा



बाबा...! ओ...! बाबा...! आपल्याला नवीन बैल कधी घ्यायचा. घेऊ रे बाळा ...! आपल्याकडे पैसे आले की नक्की बैल घेऊ आपण, सखाराम हळू आवाजात मुलाशी बोलला. मलापण बैल घ्यावे वाटतात. पण पैशाचा मेळ बसत नाही. सखाराम निराश होऊन मंग्याशी बोलत होता. मंग्याला काय माहीत बैल घेण्यासाठी फक्त इच्छा असून चालत नाही तर

त्यासाठी नगदी पैसेही लागतात. पण यावर्षी पेरणीच्या आधी काहीही झाले तरी बैल घ्यायचेच ! असे सखारामने मनोमन ठरवले. बैल असले की, शेतीची मशागत चांगली होते. पीक पाणी चांगले येते त्याचबरोबर शेणखतही जमिनीला मिळते. असा विचार सखाराम मनाशीच करत बसला होता. उन्हाळ्याचे दिवस सुरू होते लग्नसराई धुमधडाक्यात सुरू होती. पाहुण्या राहुण्यांच्या घरी लग्नासाठी येणे जाणे सुरूच होते. सखाराम असाच एक दिवस सकाळीच एका पाहुण्यांच्या घरी पाहूनकीसाठी निघाला. सखारामच्या पत्नीने हळूच आवाज दिला. अहो...! ऐकले का? मी काय म्हणते...! पाहुण्याकडे चाललाच आहे तर, त्यांच्याकडे काढा बैलाचा विषय. किती दिवसापासून बैल घ्यायचे म्हणताय ना ! पाहुण्याकडे बघा विषय काढून. त्यांच्या गावातील कुणाकडे बैलजोडी विक्री असेल तर पाहुणे दाखवतील कि तुम्हाला ! सखाराम चिडून म्हणाला अ...! पाहुण्याकडे बैलाचा विषय काढायला येथे कुठे? नगदी पैसे आहे माझ्याजवळ...! पाहुण्यांच्या कडे कशाला बैलाचा विषय. त्यांनी बैल दाखवले व पसंत पडले तर बोला म्हणतील लगेच किंमतीचे...! मंग काय पैशाची दैना दाखवु तिथे...! पार्वती हळूच म्हणाली, '' माझ्यावर काय चिडताय, माझ्यावर चिडून काय बैल फुकट

मिळणार आहे. '' बैल कुठूनही घेतले तरी पैसे लागतीलच. पैसे ही महत्त्वाचे आहे व बैल सुद्धा. घेऊनच टाकू यावर्षी...! पैशाचे काय? जाईल फिटून कसेबी माला टालावर. तुम्ही फक्त बैल पाहून घ्या. तुमच्या पसंत असेल तर, पुढचे पुढे बघू. सखारामने मुकाट्याने ऐकून घेतले व मान हलवून म्हणाला, बघतो तसे पाहुण्यांना म्हणून, बैलाचे...! बरं...! मी येतो आता...! पोरांवर लक्ष ठेव. त्यांना जास्त वेळ एकटे कुठे जाऊ देऊ नको. घरीच खेळा म्हणा...! ऊन जास्त आहे उन्हाचा चटका लागला तर परत बिमार पडतील. असे बोलून सखाराम पाहूनकीसाठी घरून निघाला. मनात मात्र बैलाचा विषय पक्का करून टाकला.

दुपारची वेळ होती पाहूनकीच्या कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या ठिकाणाहून नवीन नवीन पाहुणे येतच होते. बैठकीत पाहुण्यांची गर्दी जमू लागली. हळूहळू नवरदेवा कडील पाहुणे आले मानपान झाला. लग्नाची बोलणी झाली. जेवण आटपलं, लग्नाची तारीख ठरली. कार्यक्रम आटोपला पाहुणेमंडळी शिदोरी घेऊन निघाली. जवळजवळ सांजवेळ झाली सर्व पाहुणे निघून गेली. सखाराम पाहुण्यांना म्हणतो, येतो मी आता...! पाहुणे हळूच म्हणतात, ‘‘ अहो दाजी एवढ्या उशिरा कशाला जाता. '' परत आमची बहीण म्हणेल पाहुण्याची लय अडचण

झालती का? आलेच आहे तर थांबा आता आजच्या दिवस. गप्पाटप्पा होईल, आराम होईल सकाळी जा उठून. तसही बैलाचा विषय राहिलाच की आपला बोलायचा. संध्याकाळी बोलता येईल...! थांबूच आजच्या दिवस असे मनाशीच सखाराम पुटपुटला. हो...! हो...! तसा उशीरच झाला. गाड्याही लागतील याचा भरोसा नाही. थांबतो रात्रभर सकाळीच जाईल उठून गावाकडं...! असं म्हणून सखाराम व पाहूणे पुन्हा एकदा घरात बैठकीत येऊन बसतात. पाहुणे सखारामला पीक-पाणी, लेकरां बाळाची खुशाली विचारतात. नवीन काय चाललं दाजी...! काही नाही बस घर शेत...! आणि शेत घर...! दुसरं काय असणार आपल्या नशिबी. पीक पाणी कसे झाले यावर्षी दाजी. बरे झाले जेम...! तेम...! सखाराम हळू स्वरात म्हणाला. माझ्याकडे बैल नाही दुसरे जनावर नाही. आता काय शेतात काम धंदा नाही. चालू आहे लग्न खाणं आरामशीर.

बरं...! किसनराव मी काय म्हणतो. कुणाकडे चांगली बैल जोडी आहे का विक्री? ‘‘ कुणाला घ्यायची दाजी बैलजोडी ’’ किसनराव विचारतात. मीच घ्यायची म्हणतोय ! दरवर्षी पेरणीच्या अगोदर बैलजोडी नसल्यामुळे मशागतीची लय फजिती होते. पेरणीला पण लय उशीर होतो. जो तो आपली

पेरणी आटोपल्यानंतर बैलजोडी देतो. ते पण खरं आहे दाजी...! पण बैलजोडी नाही म्हटल्यावर काही विलाज चालत नाही. आमच्या शेजाऱ्यांची बैलजोडी विक्री आहे. लय माणसं बघून गेली. बैलजोडी तगडी आहे त्यामुळे अजून काही विकली नाही. तुम्ही घ्या दाजी सकाळी बैलजोडी बघून ! तुम्हाला पसंत पडली तर भावाचे बघू पुढच्या पुढे? काय करायचं ते...! किसन तळमळीने बोलत होता. सखाराम म्हणाला, ‘‘ बरं…! बरं…! बघू की सकाळी ’’ आपल्याला झेपली तर घेऊ नाहीतर देऊ सोडून. गप्पा मारत मारत दोघेही झोपी गेले. सकाळ झाली सखाराम झोपेतून उठला. चहापाणी, अंघोळ आटपली किसन व सखाराम न्याहारीसाठी बसले. दाजी मी दिला निरोप शेजाऱ्यांना बैलाच्या बाबतीत थोड्यावेळाने जाऊ बघायला. गप्पा मारत मारत पोटभर न्याहारी करून सखाराम व किसन बैलजोडी पाहण्यासाठी शेजारच्या शेतात निघून जातात. उंचपुरी, लालसर रंगाची, टोकदार शिंगांची, अगदी लुसलुशीत अशी बैल जोडी होती. बैलाच्या मालकाने पाठीवरून हात मारून दाखविला. बैल आतिशय चांगले आहेत. मारत नाही, कामाला, चरायला लय चांगली आहे. दातात पण पुर्ण भरली आहे. किसनरावच्या नेहमीच पाहण्यातील आहे आमची बैल जोडी...! लय लोकांच्या पसंत पडली. पण भावाकडून नाही

जुळला सवदा. खरं सांगु का, पाहुणे...! मला बैलजोडी विकायची इच्छा नाही पण पोरीचं लग्न ठरलंय...! त्यामुळे चार पैसे हातात शिल्लक असलेले बरे...! म्हणुन काढली बैलजोडी विक्रीला. बगा तुमच्या पसंत पडली असेल तर किसनरावच्या मध्यस्तीने देऊ हिशोबा हिशोबाने लावून. बैलजोडी सखारामच्या पसंतीला पडली होती. त्यामुळे सखारामने किंमत विचारून घेतली व कळवतो निरोप म्हणून सखाराम व किसन घरी वापस निघून आले. पाहुण्यांचा निरोप घेऊन सखाराम दुपारी आपल्या गावी परतला.

पार्वती सकाळपासून वाटच पाहत होती. सखाराम घरी येताच लेकरांनी एकच गोंधळ केला. बाबा आले...! बाबा आले...! जसा काही सखाराम खूप दिवसापासून गावी गेला होता. शेवटी बाप आल्याची खुशी लेकरांनी त्यांच्या गोंधळातून प्रगट केलीच. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर हळूच पार्वतीने बैलाचा विषय काढला. सखारामने सर्व हकिगत सांगितली. नगदी पैसे असेल तर पंचवीस हजारापर्यंत बैलजोडी मिळते. बैल एकदम खास आहेत पंचवीस हजाराला घ्यायला पुरतात. पण माझ्याकडे जेमतेम दहा हजार रुपयेच आहेत नगदी. बाकीचे पंधरा हजार रुपये आणायचे कुठून ? असा प्रश्न उपस्थित करून

सखारामने पार्वतीला सुद्धा विचारात पाडले. थोडा वेळ दोघेही पैशाच्या विचारात शांत बसले. अंगणात खेळणाऱ्या लेकरांचा स्पष्ट आवाज येत होता. मध्येच पार्वती म्हणाली, मी काय म्हणते तुम्हाला? बैल जोडी आवडली ना...! मग या घेऊन. मी माझा दागिना देते तुमच्या जवळ तो सोनाराकडे घेऊन जा व मोडीत किती पैसे येतात बघा. बैलजोडी महत्त्वाची आहे. गळयातील दागिना काय? कधी नवा करता येईल. पार्वतीच्या बोलण्याने सखाराम भारावून गेला. अग पार्वती...! तुझ्या गळयात काही चार-पाच दागिने नाहीत मोडायला...! एकुंती एक मंगळसूत्राची पोत हाय...! ती कशी काय मोडते. ते तर बाईच्या जातीचा महत्त्वाचा दागिना असतो. नको...! नको...! तो पर्याय नकोच. बघू दुसरी काही व्यवस्था होती का पैशाची. सखाराम उठून बाहेर गेला. दोन दिवस प्रयत्न करूनही पैशाचा मेळ बसत नाही. म्हणून शेवटी सखारामने बायकोच्या गळयातील मंगळसूत्र नेऊन सोनाराकडे मोडीत विकले. त्याचे नगदी अठरा हजार रुपये सखारामच्या हातात आले. दागिन्याचे पैसे व स्वतः जवळचे पैसे घेऊन सखाराम किसनरावच्या गावी गेला. त्यांच्या मदतीने नगदी पैशाने बैलजोडी विकत घेऊन आला. सखाराम बैलांना घेऊन दारात येताच लेकरं उड्याच मारू लागली. लेकरांना खूप आनंद झाला. पार्वती

ओवाळण्यासाठी ताट घेऊन बाहेर आली. बैलाच्या पायावर पाणी टाकून बैलांना ओवाळले. भाकरीचा कुटका बैलांच्या वरुन ओवाळून फेकला. मालकीण बाई काय नाव ठेवायचे यांचे आता...! तुम्हीच सांगा. सखाराम हसतच पार्वतीला म्हणाला. हरणा सारखी सुंदर जोडी आहे म्हणून याचे नाव ‘हरण्या’ व याचा सोबती म्हणून याचे नाव ‘सुदाम्या’ ठेऊया. घरात नवीन पाहुणे आल्यासारखे बैलजोडीने घरातील वातावरण आनंदी झाले होते. पार्वतीच्या समजुतदार पणामुळे आज सोन्याचे शिंग दारात आले होते. याचा आनंद सखारामला मनोमन झाला होता. घरचीच बैलजोडी असल्यामुळे शेतीच्या कामाला सुरुवात झाली. दर वर्षीपेक्षा या वर्षी लवकर पाऊस पडला. त्यामुळे पेरणीही लवकर आटोपली. शेतातील माल चांगला उगवला होता काही दिवसांनी खुरपणी, कोळपणी झाली. आता रान हिरवंगार दिसू लागलं होतं. श्रावण महिन्याला सुरुवात झाली होती. काही दिवसावर पोळा हा सण येऊन ठेपला होता. यावर्षी सुदाम्या व हरण्यामुळे पोळा या सणाला विशेष महत्व आले होते. शेतकऱ्यांच्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा सण पोळाच असतो. त्यामुळे सखाराम व पार्वती सुद्धा खूप आनंदी होती. बैलजोडीसाठी यावर्षी नवा साज घ्यावा लागणार म्हणून, पार्वती काही दिवस दुसऱ्याच्या शेतात कामाला जाऊ लागली.

दोन पैसे नगदी मिळाले तर बैलासाठी चांगला नवा साज घेता येईल. श्रावण महिन्यातील दिवस भुरकून निघून गेले. पोळा सहा दिवसांवर आला होता. सखारामने शेजारच्या गावावरून आठवडी बाजारातून सुदाम्या व हरण्यासाठी नवा कासरा, वेसण, कवड्या व घुंगरांच्या माळा, बाशिंग, झुल, हिंगूळ, बेगड असा नवा साज आणला. पोटच्या लेकरा सारखीच हेही दोन लेकरं समजून सखाराम बैलांना खूप जीव लावत होता. सकाळपासून बैलांचा साज घेण्यासाठी बाजारात बाबाच्या मागे मागे फिरणारा मंग्या मात्र खूप थकला होता. जेवून तो आज लगेच झोपी गेला.

सकाळ झाली दिवस उगवला. पार्वतीने हळूच मंग्याला आवाज दिला. मंग्या...! ये ! मंग्या...! उठ आज पोळ्याचा दिवस आहे ना ! तुला बैल धुवायला जायचे नाही का? तुझ्या बाबासोबत. पार्वतीने आवाज देताच मंग्या पटकन उठला. गडबडीने तोंड धुवुन त्याच्या बाबासंग नदीवर गेला. बैलांच्या अंगावर पाणी उडवून उडवून बैलांना अंघोळ घातली. सुदाम्या व हरण्या खूप गरीब होते. लेकरा पासून ते मोठ्या माणसांपर्यंत कोणालाही सहज जवळ येऊ देत असत. त्यामुळे मंग्या बैलांना खूप सांभाळत असे. दिवसभर कासरा हातात घेऊन मंग्याने

बैलांना गवत चारले. खांदमळन, पोळा, शिळा पोळा असे तीन दिवस त्यांचा सण म्हणून बैलांना फक्त चारा गवत खाणे व आराम करणे एवढेच काम असते. बर का...मंग्या ! लक्षात ठेव. या तीन दिवसात बैलांना शेतीच्या कामाला जुपायचे नसते. सखाराम मंग्याला समजून सांगत होता. दुपारी बैलांना घेऊन मंग्या बाबासोबत घरी आला. सखारमने सुदाम्या व हरण्याला अंगणात बांधून त्यांच्या शिंगाना हिंगूळ लावू लागला. बैलांना नवीन वेसण, नवीन कासरा लावण्यात आला. गळयात कवड्याची व घुंगराची माळ घालण्यात आली. बाशिंग बांधून पाठीवर झुला टाकल्या. शिंगांना नवीन बेगड चिटकवून बैल पोळयात जाण्यासाठी तयार झाले होते. आज सुदाम्या व हरण्या ओळखूच येत नव्हते. नवीन साजाने बैलजोडी उठून दिसत होती. शेवटी दुपारचे चार वाजले. गावातील बैल वेशीवर पोळयात जाऊ लागली. गावाच्या वेशीवर गावातील सगळया बैलांचा पोळा भरत असे. सखाराम मंग्याच्या हातात कासरा देऊन बैलांना घेऊन वेशीवर आला. गावातील सगळे बैल जमा झाले होते. कधी नव्हे ती सर्व बैल सजवून एकत्र आली होती. पोळा खूप भरला होता. सखाराम व मंग्या दोघेही खूप खुश होती. कितीतरी दिवसांची त्यांची इच्छा आज पूर्ण झाली होती. दोघेही बैलांचा कासरा हातात धरून पोळा फुटण्याची वाट

पाहत होते. ‘‘ बाबा...! कधी फुटणार पोळा ’’ मंग्या हळूच म्हणाला. सर्व गावातील बैल आले की, पाच वाजता फुठत असतो पोळा. आता थोड्या वेळात फुठेलच पोळा तू आवाजाकडे लक्ष ठेव. आवाज आला की लगेच सर्व लोक बैल घेऊन तोरणा खालुन धावत जातील. आपल्यालाही लगेच धावावे लागेल नाहीतर मागचे बैल आपल्याला तुडवून जातील असे सखाराम मंग्याशी बोलतच होता. तोच डफड्याचा आवाज सुरु झाला. आंब्याच्या पानाचे तोरण आडवे ओढले व पोळा फुटला. पोळ्यातील बैल एका पेक्षा एक जोरात धावत सुटली. कुणाचा बैल निसटून गेला, तर कुणाचा कासरा सुटला. गावातील तुकाराम जोरात पळता पळता पडला बैलांनी त्याला तुडवून काढले. लोकांनी गर्दीतून पटकन तुकारामला बाहेर ओढले. सगळ्या गोंधळात सखाराम दोन्ही बैलांना व मंग्याला घेऊन हळूहळू तोरणा खालून निघाला. बाबा...! बाबा...! पळवा लवकर सुदाम्या व हरण्याला. चला लवकर घरी सगळयांच्या आधी...! मंग्याची घाई सुरू होती. शेवटी गावातून चक्कर मारून सखाराम मंग्याला व बैलांना सुखरुप घेउन अंगणात आला. पार्वती बैलांना ओवाळण्यासाठी ताट घेऊन उभीच होती. पार्वतीने बैलांना मंग्याला व सखारामला कुंकू लावून ओवाळले. बैलांना पुरणपोळी चारली. बैल शेजारी

पाजारी मिरवून शेवटी सखारामने बैल गोठ्यात नेऊन बांधले. स्वतःचे बैल पोळयात मिरवून आल्याचा आनंद सखारामच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. शेतात दिवस-रात्र कष्ट करून शेती पिकवण्या मध्ये राबणारा आपला धनी व सुदाम्या हरण्याच्या कष्टाच्या पाय गुणाने पिकणारी शेती यापुढे आपल्या मंगळसूत्राची किंमत कमीच आहे. सखारामच्या चेहऱ्याकडे पाहून पार्वतीच्या मनात विचार आला. लेकरांना घेऊन सखाराम जेवायला बसला. आईच्या हाताची गरम-गरम पुरणपोळी खात मंग्या हळूच म्हणतो. बाबा...! रोजच पाहिजे असा पोळा.

# पाच

# अव्यक्त प्रेम



आज सकाळपासून थंड गार वारा सुटला होता. हिवाळ्याचे दिवस असल्याने गुलाबी थंडी सगळ्यांना हुडहुडी भरवत होती. झोंबणाऱ्या थंडीपासून बचावासाठी सगळे जण काहीना काही उपाय करत होते. म्हातारी माणसं अंगावर घोंगडी, चादर गुंडाळून बसायचे. लहान मुलं स्वेटर व डोक्यात गोंड्याची टोपी घालून बिनधास्त खेळायची. तरुण पोरं सकाळी

सकाळी कचरा पेटवून मोठा जाळ करत त्याच्या भोवती शेकत बसायची. हिवाळा जणू सगळयांना थंडी बरोबर मस्ती व आनंद वाटत फिरायचा. आज सकाळीच मी या कडाक्याच्या थंडीत आवरून गावातील महादेवाच्या मंदिरात निघाले. आईने मोठ्याने ओरडून सांगितले. अंगावर ने गं ! पोरी काहीतरी...! थंडी जास्त आहे. आई मी देवळात चालले ...! बाहेर फिरायला नाही. देवळात अंगावर घेऊन गेले तर, तिथला पुजारी हसेल की? मला...! असे म्हणून मी पूजेचे ताट घेऊन मंदिराकडे जायला निघाली. जातांना वाटातल्या मैत्रिणींना आवाज देऊन त्यांनाही सोबत घेऊन मी महादेवाच्या मंदिरात गेले. मंदिरातील पुजारी काका नुकतीच पूजा करत होते. मी व माझ्या मैत्रिणींनी महादेवाच्या पिंडीची पूजा करून दर्शन घेतले. व देवळाबाहेर येऊन आम्ही सर्वजणी पायरीवर बसलो. सकाळी सकाळी धुक्याच्या थंडीतून वाट करत सूर्यदेवांनी आपल्या किरणांनी हळूच प्रकाश टाकला. प्रकाशाबरोबर नवचैतन्य जणू बाहेर आले होते. अगदी प्रसन्न अवस्थेत पुजारी काका पूजा आटोपून मंदिराच्या पायऱ्या उतरत होते. मी हळूच आवाज दिला ‘‘ काका प्रसाद द्या आम्हाला ’’ पुजारी काकांनी आवाज ऐकताच...! मध्येच थांबून आम्हा मुलींना प्रसाद दिला. पोरींनो आज सकाळीच थंडीत महादेवाच्या दर्शनाला कसं काय?

सहज आलो काका...! कालच बारावीची परीक्षा संपली. आलो मग महादेवाच्या दर्शनाला मी महाराजांना सांगितले. छान...! बरं झालं की, सकाळी सकाळी महादेवाला ही नवीन भक्तांचे दर्शन झाले. नाहीतर ! रोज सकाळी माझ्या भेटीने महादेवाला ही कंटाळा आला असेल...! असे म्हणून, हसत...! हसत...! पुजारी काका मंदिराच्या पायऱ्या उतरून निघून गेले. मी व माझ्या मैत्रिणी सुद्धा हसत हसत पुन्हा एकदा पायऱ्यावर येऊन बसलो. सकाळच्या धामधुमीत गावातील सगळी लोकं आपापल्या कामधंद्यात व्यस्त होती. तेवढ्यात गावातील विस वर्षांचा गोरापान, उंचापुरा तरुण धोतर नेसून, खांद्यावर घागर घेऊन मंदिराकडे येत होता. माझे त्या तरुणाकडे लक्ष गेले. तेवढ्यात तो तरुण मंदिराच्या पायऱ्या चढून मंदिरात निघून गेला. मी व माझ्या मैत्रिणी सुद्धा घराकडे जायला निघालो. मंदिराच्या पायऱ्या उतरता उतरता मी मात्र त्या तरुणाच्या विचारात हरवून गेले. कोण असेल तो तरुण? किती भक्तिभावाने सकाळीच महादेवाच्या पूजेला आला. एका हातात धोतराचा घोळ धऊन व दुसऱ्या हाताने खांद्यावर घागर धरून झपाझपा पायऱ्या चढत होता. किती त्याच्या चेहऱ्यावर तेज होते. मी हरवलेल्या विचारात असतानाच मैत्रिणीं हळूच म्हणतात. येतो गं उमा आम्ही...! मी दचकून हो...! हो...! या गं...! असे म्हणून,

मी घरी पोहोचले. बारावीची परीक्षा नुकतीच संपली होती. आता अभ्यासाचा ताण नाही. या सुट्ट्या अगदी आनंदात व मस्तीत घालवायच्या असे मी मनाशी ठरवले होते.

पोरीने तालुक्याच्या गावाला जाऊन बारावीची परीक्षा दिली. या अभिमानाने माझ्या वडिलांचा ऊर भरून आला होता. ते खूपच खुश होते. बाबांनी दुपारी आईला आवाज दिला. ऐकतेस का गं...! उमा कुठे गेली? सकाळ पासुन दिसलीच नाही. ‘‘ मगाशीच जेवून झोपली ती आतमध्ये ’’ आई चिडुन बोलली. परीक्षा संपली ना...! त्यामुळे पोरीचे पाय कुठे एका जागेवर आहेत. सकाळपासून नुसती फिरत आहे इकडून तिकडे, आई बाबांना सांगत होती. बरं...! बरं...! झोपू दे तिला. आपल्या घराण्यात गेल्या अनेक पिढीत एकही मुलगी बारावी शिकली नाही. आपल्या लेकीने तालुक्याला जाऊन बारावीची परीक्षा दिली. महादेवाच्या कृपेने सगळं काही छान होत आहे. उमाला जास्त कामाला लावू नको ! ती आधीच अभ्यास करून थकली त्यात पेपरं दिली. आता तिला आराम करू दे...! आई मधेच चिडुन म्हणाली ‘‘ तिच्या मनाला वाटेल ते करत बस म्हणा ’’ , पोरीने बारावीची अवघड परीक्षा दिली हे खरं आहे ! म्हणून तिला डोक्यावर घेऊ नका...! उमा लेकीची जात आहे. एक ना एक दिवस दुसऱ्याच्या घरी नांदायला जावं

लागणार...! नुसते शिक्षण असून चालणार नाही. तर घरातली कामं पण करता आली पाहिजे. एवढ्या दिवस नुसती शाळा...! शाळा...! शाळाच होती. आता मी तिला घरातली सर्व कामं शिकवणार आहे. तुम्ही लय लेकीची बाजू घेऊ नका ! मला पण तिची काळजी आहे. आई मोठ्या मोठ्या आवाजात बोलत घरात निघून गेली. थोड्यावेळाने आईने मला आवाज दिला. उमा...! ये उमा...! उठ आता. किती वेळ झोपणार. हात-पाय, तोंड धुऊन देवाला दिवा लाव. आईने आवाज देताच मी दचकून उठले. बापरे...! किती वेळ झाला झोपून. किती दिवसांनी दुपारी शांत झोप लागली. मी गरम पाण्याने हात तोंड धुऊन फ्रेश झाले. देवापाशी दिवा लावला, देवाला हात जोडून नमस्कार केला. मिटलेल्या डोळ्यापुढे अचानक महादेवाच्या मंदिराच्या पायऱ्यावर चढणारा तो तरूण आठवला. त्या आठवणीने जरा प्रसन्न वाटले. त्या दिवसापासून का कुणास ठाऊक ! तो तरुण आठवला की मला खूप छान वाटायचे. सुट्टीचे दिवस मजेत चालले होते. रोज धमाल-मस्ती, मैत्रिणीसोबत गप्पा-टप्पा मारत वेळ जात होता. उद्या सोमवार आहे सकाळीच महादेवाच्या देवळात जाऊन येऊया असा मनाशीच मी विचार करत होते. विचार करत करत मला कधी झोप लागली कळले सुद्धा नाही. सकाळी लवकर उठून महादेवाच्या दर्शनाला मी निघाले. आज मात्र मी मैत्रिणींना

सोबत घेतले नाही. मी एकटीच सकाळी सकाळी मंदिरात पोहोचले. पुजारी काका पूजा करतच होते. मी महादेवाच्या पिंडीची मनोभावे पूजा केली व दर्शन घेतले. बाहेर येऊन मंदिराच्या पायरीवर थोडावेळ बसले. तेवढ्यात त्यादिवशीचा तो तरुण आजही उघडा धोतर नेसून, खांद्यावर घागर घेऊन, मंदिराकडे येत असलेला मला दिसला. मी एकटक त्या तरुणाकडे बघतच राहिले. तो झपाझपा मंदिराच्या पायऱ्या चढून मंदिराच्या गाभाऱ्यात शिरला. मी आज त्याला मन भरून पाहिले होते. अगदी उंचपुरा, गारशे डोळे, देखणा होता तो...! त्याला बघून मला प्रसन्न वाटले. चला महादेवा बरोबर याही महादेवाचे दर्शन झाले असे मनाशी पुटपुटत मी घरी आले. आज दिवसभर मात्र त्या तरुणा विषयीचे कुतूहल मनात सारखे घोळत होते. मी आता देवळात जायला सोमवारची वाट बघत नव्हते. मी रोज देवळात जाऊ लागले. महादेवा बरोबर त्या तरुणाचे दर्शन मला घ्यावे वाटू लागले. पायऱ्या चढत चढत तो तरूणही माझ्याकडे चोरून बघायचा. पण मी त्याला बोलायची हिम्मत केली नाही. मी रोजच महादेवाच्या देवळात जाऊ लागले. याने माझे बाबा खूप आनंदी होते. पोरगी खूप धार्मिक झाली असे त्यांना वाटू लागले. मी एक दिवस ठरवले ! कोण कुठला हा तरुण? रोज मंदिरात येतो. या अगोदर त्याला आपण पण गावात कधीच बघितले नाही. हा गावात कुठेही दिसत

नाही. मात्र मंदिरात हमखास येतो. केवळ योगायोग का होईना परंतु सुरुवातीला तो मला भेटत गेला. उद्या मात्र त्याला नाव गाव विचारायचे. ठरल्याप्रमाणे मी मंदिरात आले. महादेवाचे दर्शन घेऊन पायरीवर बसले. तो तरुण नेहमी प्रमाणे हातात धोतर धरुन, खांद्यावर पाण्याची घागर घेऊन पायऱ्या चढत चढत मंदिराकडे येत होता. माझ्या जवळ येताच ! मी त्याला आवाज दिला. कोण आपण? नवीन दिसता या गावात ! तो मात्र एकही शब्द न बोलता मंदिरात निघून गेला. मला जरा आश्चर्यच वाटले ! तो एक शब्दही न बोलता निघून गेला. एकतर बहिरा असावा, नाहीतर जास्तीचा शहाणा तरी असेल ! असे मी मोठ्यांने पटकन बोलून गेले. आज मात्र तो घाईगडबडीत पूजा करून मंदिराच्या बाहेर आला. मी मात्र त्याच्या शांत राहण्याने रागावून अध्यापही पायऱ्यावर त्याच विचारात बसून होते. तेवढ्यात त्याने मला हळूच आवाज दिला. मगाशी आपण मला आवाज दिला होता ना...! हो...! पण आपल्याला ऐकू येत नाही वाटतं ! तो तरुण गालातल्या गालात हसत म्हणाला, ‘‘ तसे नाही काही, मला छान ऐकू येते ’’ पण मी सकाळी महादेवाचे दर्शन घेतल्याशिवाय कोणालाच बोलत नाही. माझा तसा नियमच आहे. अरे वा...! छान...! नियम आहे तुमचा ! आम्हाला नाही असे नियम वगैरे आवडत. देवाने छान तोंड दिले सगळयांना बोलण्यासाठी त्याला कशाला नियम

हवेत. मी नेहमी कधी कुणाशी न बोलणारी आज मात्र या अनोळखी तरुणाशी धीटपणे बिनधास्त बोलत होते. मधेच तो म्हणाला, ‘‘ मी महादू मिठाईवाला ’’ आम्ही या गावचे नाही. आम्ही मूळचे "राजस्थानचे" आहोत. माझ्या बाबाचा मिठाई चा व्यवसाय आहे. आम्ही गावोगाव मिठाई विकत फिरत असतो. या गावात मिठाईचा व्यवसाय बरा चालतो म्हणून गेल्या सहा महिन्यापासून येथेच वास्तवास आहोत. मला लहान पणापासून महादेव खूप आवडतो. म्हणून माझे नावही महादूच पडले. तसे माझे जन्मनाव खरे “ चंदनशिव " आहे. तसेही माझ्या दोन्ही नावात महादेव आहेतच की ! तुम्हाला जे आवडेल ते लक्षात ठेवा. तुमचे काय नाव? तुम्ही पण रोजच महादेवाच्या देवळात येत असता ! तुमच्याही नावात...! महादेव आहे की काय? अगदी गोड आवाज होता महादूचा. अतिशय प्रेमळ व चांगल्या भावनेने तो माझ्याशी बोलत होता. जणू आमची खूप दिवसांची ओळख असल्यासारखे आम्ही मंदिराच्या पायऱ्यावर बोलत उभे होतो. मी एका अनोळखी तरुणासोबत बिनधास्त बोलत आहे याचे भान मला राहिलेच नव्हते. महादूने मला पुन्हा एकदा विचारले. तुमचे नाव काय? की तुम्हाला पण ऐकू येत नाही. मी मगाशी त्याला बहिरा म्हणाले त्याने ते ऐकले होते. मी त्याला नाव न सांगता तसेच लाजत...! लाजत...! पटापटा पायऱ्या उतरून घराकडे निघून

आले. महादू खूप वेळ एका जागेवर उभा राहून मला बघतच होता. रोज वाटायचे हा तरुण कोण आहे. आज मात्र त्याच्याशी बोलून सगळ्या प्रश्नांची उत्तरे मिळाली. किती गोड आहे नाव त्याचे 'चंदनशिव ' अगदी नावाप्रमाणे शिवाचा भक्त शोभतो.

मी आता महादेवाच्या देवळात न चुकता रोज जाऊ लागले. महादेवा बरोबर महादुचेही दर्शन घेण्याचा नित्यक्रमच माझा झाला होता. मला महादू आवडू लागला होता. मला त्याच्याविषयी आकर्षण वाटू लागले होते. सहज म्हणता म्हणता मी त्याच्या प्रेमात पडले होते. आज मात्र कमालच झाली होती. तो माझ्या आधी देवळात येऊन पूजा करुन पायऱ्यावर माझी वाट बघत होता. मी मंदिराच्या पायऱ्या चढून त्याच्या जवळ जाताच त्याने आवाज दिला. ‘‘ उमा हा घे प्रसाद, मी बनवलेली मिठाई आहे.’’ तुझ्या नावा इतकीच मिठाई पण गोड आहे. असे म्हणून महादू निघून गेला. मी मात्र विचारात पडले ! आपले नाव याला कसे काय कळले. महादू मिठाईवाला होता खरा ! पण मिठाई इतकाच दिसायला गोड, स्वभावही गोड, व बुद्धीने ही गोड होता. त्याने पुजाऱ्यांकडून माझ्या विषयीची सर्व माहिती मिळविली होती. माझ्याप्रमाणे मीही त्याला खूप आवडत होते पण त्याने तसे कधी बोलून दाखवले नाही. लोकांच्या नजरा चुकवून मंदिरात भेटणे, बोलणे आमचे सुरूच होते. सकाळी सकाळी जणू महादेव पुजारी,

महादू व मी फक्त आम्हा तिघांनाच बोलवत होता. आमच्या तिघांशिवाय सकाळी कोणीच लवकर मंदिराकडे येत नव्हते. त्यामुळे आम्ही मंदिराच्या पायऱ्यावर बसून एकमेकांशी बोलत बसायचो. एकमेकांच्या आवडी निवडी, स्वभाव, विचार, आचार माहिती झाले होते. आम्हा दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम होते पण तसे कुणी बोलून दाखवत नव्हते. त्यामुळे आम्ही मित्र म्हणून एकमेकांशी वागत होतो. आमची मैत्री देवळातील महादेवाला, पुजारी काकाला व आम्हालाच माहित होती. आम्ही पुजारी काका इतकेच महादेवाचे भक्त झालो होतो. महादुमुळे मलाही भक्तिची गोडी लागली होती. माझे प्रेम मुळातच तारुण्यातील जरी होते तरी ते भक्तीच्या गोड रसाळ वाणी प्रमाणे होते. मला महादू मनापासून आवडायचा तो त्यातील सद्गुनामुळे ! त्यामुळे आमच्या प्रेमात कृष्ण-राधे सारखा मैत्रीचा प्रेम भाव अधिक होता. बारावीच्या परीक्षेनंतरचा सुट्टीचा कालावधी महादुच्या प्रेमात मजेत जात होता. थंडी म्हणता म्हणता हिवाळा व उन्हाळा दोन्ही ऋतू कधी संपले कळलेच नाही. निकालाची तारीख जवळ येत होती. मी पास झाल्यावर महादू स्वतः तयार केलेली मिठाई देवळात महादेवा जवळ ठेवणार होता. मी त्याला सांगून ठेवले होते मी पास झाले की माझ्या बाबांना घेऊन तुझ्या मिठाईच्या दुकानात येईल. महादू ऐरवी मला अनेक वेळा दुकानात यायला आग्रह

करत असे पण कारण सापडत नव्हते. त्यामुळे निकाला शिवाय ते शक्य होणार नव्हते. तू तयार केलेली मिठाई मला विकत देशील ! मी ती मिठाई घेऊन सायंकाळी देवळात येईल. तू सुद्धा सायंकाळी देवळात ये असे आम्ही एकमेकांना सांगून ठेवले होते. आमच्या मैत्रीविषयी माझ्या बाबांना, आईला कोणालाच काही माहीत नव्हते. आम्ही दोघे मंदिरात चोरुन भेटायचो ! त्यामुळे फारसे कोणालाच आमच्यावर शंका येण्याचे कारणच नव्हते.

अखेर निकालाचा दिवस उजाडला. मी सकाळीच महादेवाच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. चांगले मार्क पडण्याचे देवाला साकडे घातले. महादुने प्रसन्न चेहऱ्याने मला शुभेच्छा दिल्या व सायंकाळी माझ्या हाताने तुला मिठाई भरवेल असे सांगीतले. मी लगबगीने घरी आले. बाबा निकाल बघायला तालुक्याला जाणार होते. आज सकाळपासून घरात निकालाच्या उत्साहाची धामधूम होती. आई तर नेहमीप्रमाणे माझ्यावर चिडून होती. ‘‘ कारटी काय दिवा लावते महादेवास ठाऊक ’’ असे म्हणून आई देवघरात दिवा लावते. बाबा तालुक्याला निकाल पाहण्यासाठी जातात. मी व आई घरी निकालाची आतुरतेने वाट पाहत होते. दुपारचे तीन वाजले होते बाबा अचानक दारात येऊन उभे राहतात. मी पळतच बाबा जवळ जाऊन विचारले, ‘‘ बाबा कसा लागला निकाल ’’ बाबा

जोरात म्हणतात, ‘‘ माझं लेकरू पास झालं ! ’’ शाळेतून पहिला क्रमांक आला पोरी तुझा ! बापाचं नाव कमावलं ! माझ्या निकालाने बाबांना खूप आनंद झाला होता. तो त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. बाबांनी येतानाच तालुक्यावरून मिठाई आणली होती. मी पळत पळत देवघरात जाऊन देवाच्या पायाशी मिठाई ठेवली. आईला, बाबाला मिठाई भरवली. आईबाबांनी सुद्धा मला मिठाई भरवली. आज घरात सगळेजण आनंदाने नाचत होते. निकालाच्या आनंदाने कधी वेळ निघुन गेला कळलेच नाही. रात्र झाली ! मला एकदम महादू ची आठवण झाली. त्याला मी मिठाई घ्यायला येईल असे सांगितले होते. तो बिचारा माझी वाट पाहत असेल. कदाचित मी गेले नाही म्हणजे नापास झाले असेल ! असा तर त्याचा समज झाला नसेल. आपण ठरल्याप्रमाणे मंदिरात जायला हवे होते. मी पास झाले हे महादुला कळवायला पाहिजे होते. माझा पहिला नंबर आला ! हे ऐकून त्याला खूप आनंद झाला असता. मला त्याच्या हातची मिठाई खायची होती. या निकालाच्या घाईगडबडीने मी सायंकाळी मंदिरात जायला विसरून गेले. मला महादुची खुप आठवण येत होती. पण काय करणार ! आता तर रात्र झाली. मी ठरविले ! उद्या सकाळीच मंदिरात जायचे. महादेवाचे दर्शन घेऊन ही गोड बातमी महादुला सांगायची. त्याच्या हातून मिठाई खाता खाता त्याला सांगून

टाकायचे. तू मला खूप आवडतो. माझे तुझ्यावर खूप प्रेम आहे. ही उमा तुझी कायमची व्हायला तयार आहे. त्यालाही मी आवडते ! तो माझ्या प्रेमाला नाही म्हणणार नाही मला विश्वास आहे. कोण कुठला महादू...! कुठून आला...! कुठे जाणार...! कोणत्या जातीचा, कोणत्या धर्माचा याचा मी विचारही केला नव्हता. याविषयी त्याला कधी विचारले सुद्धा नाही. माझ्या स्वच्छ, सुंदर, प्रेमळ मनाने महादुला स्वीकारले होते. प्रेमाला जात, पात, धर्म, गरीब, श्रीमंत, प्रांत हा भेद नसतो हे माझ्या प्रेमाने दाखवून दिले होते. महादु माझा झाला नाही तरीही उमा मात्र महादुची झाली होती. महादेवाच्या आशीर्वादाने व साक्षीने मी महादुच्या प्रेमात पडले होते. हे मात्र खरं आहे ! तो मला पहिल्यांदा मंदिराच्या पायरीवर भेटला. आयुष्यात यापुढे उमा महादुचा हा जोडा आयुष्यभरासाठी मंदिराच्या पायरीवर एकत्र घट्ट जोडावा एवढीच माझी इच्छा आहे. त्या दिवशी रात्री महादूच्या आठवणीत कधी झोप लागली कळलेच नाही. मी सकाळी लवकर उठून ! पूजेचे ताट घेऊन खुशी खुशीत मंदिरात आले. महादेवाचे दर्शन घेतले. महादेवाला महादुची मिठाई ठेवायची आहे म्हणून माझ्या जवळचा प्रसाद मी ताटातच राहू दिला. नेहमीप्रमाणे पायरीवर येऊन बसले. महादुची वाट पहात आतुरतेने दूरवर नजर लावून बसले होते. नेमकी आज महादुला यायला उशीर झाला होता. तो अद्यापही आला नाही म्हणून

मला त्याचा खूप राग येत होता. मला स्वतःच्या हाताने मिठाई भरणार होता ! पण आज अध्याप आला कसा नाही ! या विचाराने माझी तळमळ होत होती. मला खुप वेळ झाला होता पायरीवर बसून ! पण महादू आलाच नाही. पुजारी काका नेहमी प्रमाणे पुजा आटपून बाहेर आले. माझ्या जवळ येऊन म्हणाले ‘‘ आता कितीही वेळ दूरवर नजर लावून बसली तरी काही फायदा होणार नाही ’’ महादू आता कधीच येणार नाही. हा घे प्रसाद...! तोंड गोड कर...! महादूने तुझ्यासाठी ही मिठाई माझ्याजवळ दिली आहे. पुजारी काका काय बोलत होते मला कळतच नव्हते. भुवळ आल्यासारखे नुसते मंदिर माझ्याभोवती गरगर फिरत होते. मी नुसती कावरीबावरी होऊन महादुला शोधत होते. पुजारी काका पुढे म्हणाले, ‘‘ पोरी महादु काल सायंकाळी मंदिरात मिठाई घेऊन आला होता. ’’ त्याने तुझी खूप वेळ वाट पाहिली. शेवटी निराश होऊन माझ्याजवळ मिठाई देऊन निघुन गेला. जातांना मला म्हणाला की, ‘‘ मिठाई सकाळी महादेवाला ठेवा व उरलेली उमाला द्या. ’’ तिला सांगा तुझा मित्र महादू रात्रीच गाव सोडून गेला आहे. तेही कायमचे...! पुजाऱ्याचे शब्द ऐकून ! मी मात्र थंडीच्या दिवसात पाण्याचे बर्फ बनावे तशी स्तब्ध गोठुन गेली होते. एका क्षणात स्वप्नांचा डोंगर कोसळून पडला होता. भुंकपाने जमीन हादरावी तसे माझे पाय लटपटत होते. एका क्षणात मी महादुच्या प्रेमात पोरकी

झाले होते. अचानक महादुचे जाणे हे अनेक प्रश्नांचे कोडेच आता उरले होते. गुलाबी थंडीत मंदिराच्या पायऱ्यावर सुरू झालेली माझी मैत्रीची प्रेम कहाणी, मंदिराच्या पायरीवरच अशी विस्कटून पडेल असे मला स्वप्नातही कधीच वाटले नव्हते. दोघांनाही एकमेकाचं प्रेम कळलं होतं ! पण ते व्यक्त न होता कायमचं मूकं झालं होतं ! पुन्हा कधीही व्यक्त न होण्यासाठी...! असंख्य प्रश्नांचे काहूर मागे सोडून महादू आयुष्याच्या वळणावर पुन्हा कधी? कुठे? भेटेल याचा ठावठिकाणा न सांगता माझ्या आयुष्यातून कायमचा निघून गेला होता.

# सहा

# पाऊलवाट



दिवस मावळतीला आला होता. अंगणातील वडाच्या झाडावर नेहमी प्रमाणे पक्षांनी जमायला सुरुवात केली होती. सर्व पक्षी वडाच्या झाडावर आले की, त्यांची किलबिलाट सुरू होत असे. हे पक्षी जणू आमच्या घरातील सदस्य झाले होते. मी घरातून ओंजळभर दाणे आणून अंगणात टाकले. तसे हळूहळू वडाच्या झाडा वरील पक्षांनी अंगणात दाणे टिपायला सुरुवात

केली. मोहनच्या बाबांची वाट पहात मी दरवाजातच उभी होते. मोहनचे बाबा तालुक्याच्या गावाला एका शेठजिकडे कामाला होते. ते रोज सकाळी कामावर जात असे व सायंकाळी मिळेल त्या वाहनाने घरी येत असे. आज त्यांना कामावरून यायला जास्तच वेळ झाला होता. एरव्ही दिवस मावळायच्या दोन तास आधी ते घरी येत असत. आज मात्र दिवस मावळायला आला तरी त्यांचा काहीच पत्ता नव्हता. मी बराच वेळ त्यांची वाट पहात दरवाजातच उभी राहिले. अंधार पडू लागला तशी माझी चिंता मात्र अधिकच वाढू लागली. मी निराश होऊन स्वयंपाक घरात आले व स्वयंपाक करत बसले. आधीच त्यांना यायला उशीर त्यात स्वयंपाक उशिरा म्हटल्यावर ते परत रागावतील. मी पटपट स्वयंपाक करू लागले. मी हळूच मोहनला आवाज दिला. मोहन बाहेर अंगणात लक्ष ठेव तुझे बाबा येतीलच येवढ्यात. तुझा अभ्यास करत बस. दिवसभर शाळेत काय शिकवले ते पहा जरा. शाळेतून आल्यापासून नुसता खेळत असतो. जरा अभ्यासाकडे लक्ष दे, नाहीतर तुझ्या बाबा सारखे तुलाही रोजच तालुक्याला कामाला जावे लागेल. मोहन चिडचिड करतच अभ्यासाला बसला. इतरवेळी घरात मोहन व त्याचे बाबा खूप मस्ती करत बसतात. मोहनला फक्त मस्ती करायला पाहिजे. अभ्यासाचा खूपच कंटाळा करतो. असे मी

माझ्या मनाशीच बोलत होते. माझा स्वयंपाक आटोपला मी परत घराच्या दरवाज्यात येऊन उभी राहिले. आता मात्र सर्वत्र अंधार पडला होता. रात्र सुरू झाली होती. गावातील सर्व लाईट सुरु झाली होती. गाव विजेच्या लख्ख प्रकाशाने उठून दिसत होते. रात्र झाली तरी गल्लीतील मुले मात्र रस्त्यावर गोंधळ करत होती. मी घरात, दारात चकरा मारत होते. माझे कशातच लक्ष लागत नव्हते. मनात नाही...! नाही...! त्या शंका येत होत्या. आता बराच उशीर झाला होता. मी मोहनला जेवु घातले व त्याला झोपायला सांगितले. तो थोड्यावेळातच झोपी गेला. दारात येऊन पाहते तर गल्लीत काळं कुत्रंही जागं नव्हतं. सर्व गाव सामसूम निपचित पडलं होतं. गावातील लोकं जेवण करुन आपापल्या घरी शांत झोपी गेले होते. एरव्ही देवळात अर्ध्या रात्रीपर्यंत भजन चालत असते. आज मात्र देऊळही शांत शांत आहे. पूर्ण गावात जणू मीच एकटी जागी आहे. आज मी माझ्या मनाशी बोलत होते. मोहनचे बाबा अद्यापही आले नाही या चिंतेने मी फार अस्वस्थ झाले होते. आता मला फार भीती वाटू लागली होती. मी दरवाजा लावून घेतला व घरात एकटीच एका कोपऱ्यात रडत बसले. माझ्याकडे रडण्याशिवाय दुसरा पर्यायही नव्हता. मी एवढ्या रात्री मोहनला सोडून त्यांना बघायला सुद्धा जाऊ शकत नव्हते. मोहन बिचारा छोटा

असल्यामुळे जेवून बाबांची वाट पाहत पाहत झोपी गेला. मला मात्र मोहनच्या बाबांची चिंता झोपू देत नव्हती. मी शेवटी थकून अंथरुणावर पडले. मला डोळा लागणार तेवढ्यात, दाराची कडी वाजली. टकटक...! टकटक...! असा दोनदा-तीनदा आवाज आला. मी पटकन उठले व दाराची कडी उघडण्यासाठी दारावर गेले. क्षणभर विचार केला नेमकी कोण असेल? एवढ्या रात्री मोहनचे बाबा नसले तर...! आपण घरात एकटेच आहोत. काय करावे? कसे करावे? या विचारात पडले. तेवढ्यात परत दरवाजाचा टकटक...! टकटक...! असा आवाज आला. मी कशीतरी हिंमत करुन हळूच विचारले. कोण आहे ? बाहेरून हळू आवाज आला. अग मीच आहे...! उघड लवकर...! मीच आहे म्हणाले, पण आवाज मात्र वेगळाच वाटतो. परत मी विचारले? मोहनचे बाबा का? हो...! हो...! मीच आहे गं...! उघड लवकर...! मी पटकन दरवाजाची कडी उघडली. एकदम मोहनच्या बाबाकडे बघून माझ्या पायाखालची जमीनच सरकली. आकाशात वीज चमकावी तशी अनेक प्रश्नांची वीज माझ्या मेंदूत चमकली. मी प्रचंड घाबरले. मोहनचे बाबा रक्ताने भरले होते. डोक्यातून प्रचंड घळाघळा रक्त वाहत होते. अंगातील कपडे फाटले होते. संपूर्ण अंगाला वरखंडे लागले होते. पायात काहीच नव्हते ते अनवाणी पायी, रक्ताने

माखलेल्या अवस्थेत माझ्या समोर उभे होते. त्यांना बघून माझ्या तोंडातून शब्दच फुटेना, घसा जणू कायमचा बंद झाला होता. मी थरथरत्या हाताने मोहन च्या बाबांना पकडले. काय झाले तुम्हाला...! हे ... कसं... काय... झाले. मी त्यांना घाबरलेल्या अवस्थेत बाहेरच प्रश्न विचारत बसले. त्यांना घरात घ्यायचे भानच मला उरले नव्हते. मी एकदम भानावर आले त्यांना पटकन घरात घेतले. दाराची आतून कडी लावली. त्यांना पटकन एक ग्लास पाणी आणून पाजले. घरातील सुती कपडे आणुन त्यांचे डोके पुसले. सुती कपड्याचा काठ फाडून त्यांच्या डोक्याला पट्टी बांधली. अंगातील फाटके, रक्ताने भरलेले कपडे बदलून घेतले. त्यांचे रक्ताने माखलेले अंग पुसले. त्यांना गरम चहा करून पाजला. मनात अनेक प्रश्नांचे काहूर माजले होते. पण अवस्थाच अशी होती की, मी त्यांना यावेळी प्रश्न विचारून परत गोंधळात टाकू शकत नव्हते. त्यामुळे मी त्यांना एकही शब्द न बोलता गादीवर आराम करायला सांगितले. घरातील आंबी हळदीचा खडा उगाळून तो गरम पाण्यात शिजवून घेतला. हातापायावर, डोक्यावर, मार लागलेल्या ठिकाणी शिजलेली गरम अंबी हळद लावू लागले. त्यांची अवस्था पाहून एका डोळ्यात पाणी, तर एका डोळ्यात घरी सुखरूप आल्याचा आनंद झळकत होता. मी हळूच त्यांना म्हणाले

आराम करा आता सकाळी बोलू. तुमची अवस्था बघवत नाही हो मला...! देवाने असे कसे केले तुमच्यासोबत...! असे बोलून मी स्वयंपाक घरात जाऊन ढसाढसा रडू लागले. पदराचा बोळा तोंडात दाबुन धरला तरी रडण्याचा हुंदका मला आवरेणासा झाला होता. आज माझ्या कपाळाच्या कुंकावरच घाव घातला होता. मोहनचे बाबा अतिशय शांत स्वभावाचे, कधी कुणाशी वैर नाही. सगळयांशी मिळून मिसळून वागणारे, मनाने अगदी प्रामाणिक व कष्टाळू हा माणूस कधीच कुणाचे वाईट चिंतीत नाही. आज यांच्यासोबत काय झाले असेल?. माझे मन मात्र विचारांच्या काहूराने सुन्न झाले होते. रात्र खूप झाली होती. आज अन्नाचा घास आमच्या दोघांच्या पोटात गेला नाही. मी केलेला स्वयंपाक तसाच पडून होता. परमेश्वरा सकाळी सकाळी कुणाचे तोंड बघितले कुणास ठाऊक. आजचा हा वाईट दिवस आमच्या आयुष्यात कुणीकडुन आला. आम्ही परिस्थितीने गरीब होतो. पण कधीच कुणापुढे लाचार होऊन हात पसरत नव्हतो. मोहनच्या बाबांनी मला सुद्धा स्वाभिमानाने जगायला शिकविले होते. त्या दिवशी मला विचारा विचारात कधी झोप लागली कळलेच नाही.

सकाळी उठल्याबरोबर मी अंगणात झाडून शेणाचा सडा टाकला. दारात रांगोळी काढून घरात आले. मोहन व त्याचे बाबा अध्यापही झोपूनच होते. एरव्ही सकाळी उठून कामावर जाण्यासाठी घाई करणारे मोहनचे बाबा आज मात्र शांत पडून होते. मी त्यांच्या जवळ जाऊन त्यांना हळूच आवाज दिला. अहो...! उठता का? ते मात्र निपचित पडून होते. त्यांच्या डोक्याला खूप मार लागलेला असावा? त्यांना काहीच सुचत नव्हते. दिवस उगवुन खूप वेळ झाला होता. बाहेर कडक ऊन पडले होते. मी घरातील कामे आवरून परत त्यांच्या जवळ जाऊन त्यांना उठवले. माझ्या मदतीने ते कसेबसे उठले .चहा पाणी झाला ते मला घडलेला सर्व प्रकार सांगू लागले. लक्ष्मी मी आज कामावर गेल्यावर सकाळीच मालकांनी मागच्या महिन्याचा पगार देतो म्हणून सांगितले होते. मालक मला म्हणाले, प्रसाद जाताना तुझा मागच्या महिन्याचा पगार घेऊन जा. मी त्यांना हो म्हणालो, व माझ्या कामाला लागलो. दुपारी मालक जवळ येऊन सांगु लागले. प्रसाद आज मात्र काम थोडे जास्त आहे. तुला थोडा वेळ होईल. हरकत नसेल तर...! एक तास शिल्लक थांबून तेवढे काम संपून जा. मी त्यांना मान हलवुन हो म्हणालो व माझ्या कामाला लागलो. दिवसभर रोजच्या प्रमाणे काम केले परंतु आज मालकाने सांगितलेले

शिल्लक काम केल्यामुळे मला उशीर झाला. मी मालकाला काम संपल्याचे सांगून निघालो. पण तेवढ्यात मालकांनी मला आवाज दिला. मागील महिन्याच्या पगाराचे पाकीट माझ्या हातात देऊन मालक म्हणाले प्रसाद पैसे संभाळून घेऊन जा. मी मान हलवून हो म्हणालो व तिथून निघून आलो. रोजच्याप्रमाणे बस स्टँडवर आलो खरा, पण आपल्या गावी येणारी गाडी निघून गेली होती. मी थोड्या वेळ इकडे तिकडे विचारपूस केली पण कोणतेच वाहन काही मिळेना. उशीर झाल्यामुळे आपल्या गावातील सर्व वाहने गावी निघून आली होती. आपल्या गावाला यायला एक पाऊल रस्ता आहे. त्याने वेळही कमी लागतो व आंतरही कमी आहे. या रस्त्याने आपण घरी जाऊया असे मी ठरविले. परत गाडीची वेळ पहात बसलो तर अंधार जास्त होईल म्हणून मी त्या पाऊल रस्त्याने निघालो. आपल्या गावातील अनेक जण गाडी नाही मिळाली की याच पाऊलवाटेने तालुक्याला ये जा करत असतात. आम्हाला लहानपणी तालुक्याला यायला जायला हिच पाऊलवाट होती. रात्री मात्र अंधार पडल्यावर सहसा कोणी या पाऊलवाटेने येत नाही व जात नाही. कारण ही पाऊलवाट एकदम दाट झाडीतून व डोंगर रांगेतून जाते.त्यामुळे लोकांना चोरांची भीती वाटते. मी विचार केला आपल्यासोबत कुठे लेडीज आहे? लहान मुलही

नाही. आपल्या एकट्याला कोण खाणार...! म्हणून मी लगबगीने पाऊलवाटेने घराकडे यायला निघालो. रस्त्याने थोडा अंधार पडला होता. पाऊलवाट असल्यामुळे कोणी येणार जाणार दिसत नव्हते. मी मात्र घरी येण्याच्या घाईने पटापट माझ्याच विचारात चालत होतो. तेवढ्यात अचानक माझ्यासमोर दोन-चार माणसं आली. त्यांनी मला अडवले. कोण कुठला? नाव गाव विचारले. मला वाटले नविनच वाटसरू असावे. त्यामुळे माहिती विचार असावे. त्यांनी मला थोडावेळ तिथेच गप्पा मारत उभे केले. आजूबाजूला कोणीच नव्हते अगदी सामसूम शांत वातावरण होते. ही माणसे कुठली? अचानक कुठून माझ्यासमोर आली. कशा साठी यांनी मला इथे थांबवले. हा विचार मी मनात करतच होतो. तोच एका व्यक्तिने माझ्या डोक्यात जोरात काठी मारली. मला खाली पाडले व माझ्या जवळ काही पैसे , सोने, महत्वाच्या चीजवस्तू आहेत का? ते तपासु लागले. मला एकदम मालकाने दिलेले पगाराचे पाकीट आठवले. आता आपल्या खिशातील पैसे जाणार म्हणून मी त्या माणसांशी खूप झटापट करु लागलो. मी त्यांना खिशातून पैसे घेऊच दिले नाही. त्यामुळे ती माणसे खूप चिडली व त्यांनी मला मारायला सुरुवात केली. त्यांनी मला लाथा, बुक्या, काठीने मारले. माझ्या खिशातील पैसे काढून घेतले व


ती पळून गेली. मी मोठ मोठ्याने ओरडत होतो. वाचवा...! वाचवा...! कुणीतरी मला वाचवा...! पण रात्रीची वेळ होती. पाऊलवाट सामसूम होती. कोणीही मला वाचवायला येणार नव्हते. मला डोक्यात काठी लागल्यामुळे बहुतेक चक्कर आली असावी. मी तिथेच खाली कोसळून पडलो. मला काय होत आहे हे समजलेच नाही. मी खूप वेळ तिथेच पडून होतो. थोड्यावेळाने डोकं थंड गार पडले. रक्ताने माझे डोके, तोंड, कपडे भरले होते. मला जाग आली तेव्हा मी, हळूच उठून पाहतो तर अंधारात मी एकटाच रस्त्यात पडून होतो. मी कसाबसा उठलो हळूहळू त्या पाउलवाटेने घराकडे निघालो. डोक्याला मार, हातापायांना मार, संपूर्ण अंग झोडपल्यावाणी झाले होते. माझ्या डोक्यातील रक्त गेल्यामुळे मला काही सुचत नव्हते. मी खूप थकल्यासारखा झालो होतो. मला खूप तहान लागली होती पण जवळपास अंधारात पाणी कुठेच मिळणार नव्हते. मी फक्त घरी येण्यासाठी एकेक पाऊल टाकत पुढे पुढे चालत होतो. मला मोहन व तुझी खुप आठवण येत होती. मोहनच्या बाबांना ही सर्व कहाणी सांगता सांगता खूप घाम आला होता. त्यांच्या चेहऱ्यावर घाबरलेले भाव दिसत होते. मला तर ही सर्व हकिगत ऐकून चक्कर आल्यासारखे झाले. ते रात्रीचे चोर कसले...! दरोडेखोर म्हणा की...! त्यांनी तुम्हाला

पैशासाठी मारले व पैसेही घेऊन पळाले. दगडाच्या काळजाची माणसं कुठली...! पैशासाठी त्यांना माणसाचा जीव सुद्धा परका होतो. पैशासाठी माणसाच्या जीवावर उठणारी ही भूतच म्हणा की...! मोहनच्या बाबांच्या या अवस्थेतेमुळे मी रागाच्या भरात मोठ्या मोठ्याने बोलत होती. जाऊद्या पैशापेक्षा तुमचा जीव वाचला...! हे महत्त्वाचे आहे. पैसे काय कधीही कमावता येईल. तुम्ही पटकन चला गावातील डॉक्टरला दाखवून गोळ्या औषध घेऊन येऊया. डोक्याला पण डॉक्टर पट्टी करून देईल. आता आठवडाभर कुठेच जायचे नाही. घरातच आराम करत बसा. तुमच्या त्या दीड शहाण्या मालकाला निरोप पाठवून सांगा. तुम्ही येणार नाही ते...! आणि हो...! घडलेली हकीगत होऊ द्या त्याला माहित. नाही तर त्याला वाटेल पगार मिळाला म्हणून घरीच मौजमजा करत बसले. त्यांनी एक तास जास्तीचे काम लावले नसते, तर हे सर्व घडलेच नसते. ‘‘ लक्ष्मी मालकावर चिडून काय फायदा ’’ त्यांचा यात काय दोष आहे. त्यांनी आपल्याला जास्तीचे काम सांगितले तर मालक पगाराव्यतिरिक्त थोडे पैसे शिल्लक देतात. आणि हो...! त्यांना माहित असते असे होणार आहे तर त्यांनी कशाला थांबवले असते. आपलेच नशीब खराब आहे. महीना भराची कमाई गेली वरून असा जीवघेणा हल्ला झाला. देवाची पुण्याई कामी

आली बघ म्हणून मी वाचलो. नाहीतर त्या पाऊलवाटेवर मला सकाळ पर्यंत जाग आली नसती तर कदाचित मी कधीच घरी येऊ शकलो नसतो. तू नेहमी म्हणतेस ना...! देव आपल्याला काहीच मदत करत नाही. बघ...! आज देवाने तुझी हाक ऐकली...! माझ्या मदतीला देवच धावून आले बघ...! देवानेच मला त्या हल्ल्यातून वाचवले. मोहनचे बाबा माझी समजूत काढत होते. पण मला त्या मालकाचा रागच आला होता. गरिबीने आमच्या वाट्यावर हे दिवस आले होते. परिस्थिती माणसाला मजबूर बनवते. ते असे...! मी मनातल्या मनात पुटपुटत देवघराजवळ गेले. देवाला हात जोडून विनंती करू लागले. देवा माझ्या कुंकवाला असेच बळ दे...! माझ्या कुंकवाला नीट सांभाळ...! तुझी कृपा आमच्यावर सदैव राहू दे...! तुझ्या कृपेने आज मोठ्या संकटातून मोहनचे बाबा वाचले. मी देवाला आरती लावुन ओवाळले. आरतीचे ताट घेऊन मोहनच्या बाबांना आरती दिली. यापुढे आता कधीच त्या पाऊलवाटेने येऊ नका. मी मोहनच्या बाबांना खडसावून सांगितले. हो...! गं...! लक्ष्मी मी यापुढे नाही येणार मोहनच्या बाबांचे हे शब्द ऐकुन मला जरा बरे वाटले.

# सात

# संस्काराचे मोती



निसर्गाचा अनमोल ठेवा म्हणजे कोकण होय. सौंदर्याने नटलेल्या या कोकणात काजू, फणस व आंब्याच्या बागांनी अधिकच भर घातली आहे. या ठिकाणी जन्माला आलो

म्हणजे स्वर्गसुख प्राप्त झाल्यासारखे वाटते. कोकणातल्या निसर्गरम्य वातावरणातील मजा काही वेगळीच होती. राधिका मावशीचा जन्म याच कोकणातील मालवणचा होता. लग्नानंतर मात्र राधिका मावशींना चिपळूणला जावे लागले. सासरही कोकणातीलच मिळाले म्हणून राधिका मावशी खूप खुश होत्या. “ माहेर व सासर कोकणात मिळायला फार भाग्य लागते. ” असं त्या नेहमी म्हणायच्या. लग्नानंतर एका वर्षांनी राधिका मावशींना सुंदर कन्यारत्न प्राप्त झाले. आई व बाबा मुलीच्या जन्मामुळे खूपच खूश होते. कारण राधिका मावशीच्या सासरी तीन पिढ्यापासुन मुलगी नव्हती. मुलीच्या जन्माने तीन पिढ्यांची उणीव भरून काढली होती. थाटामाटात मुलीचे नाव ठेवण्याचा कार्यक्रम झाला. राधिका मावशीच्या सासरकडील सर्व बायका, सासू-सासरे, नवरा, दिर असे सर्वजण मालवणला आले होते. राधिका मावशीच्या सासूने मुलीच्या कानात कुर्र...! आवाज करून कुसुम नाव ठेवले. सर्वांना आवडती कुसुम आता चार महिन्याची झाली होती. कुसुमला आता स्वतःच्या घरी नेण्यासाठी तिचे बाबा मालवणला आले होते. राधिका मावशीची भरल्या ओटीने सगळयांनी पाठवणी केली. कुसुम आता बाबांच्या मांडीवर जाऊन बसली होती. आजोबा लाडात कुसुमला म्हणतात. लबाड कुठली...! बाबा आले तर...! घरी जाण्यासाठी तयार झाली. आज तुझे

रडने गायब झाले. खूप रडून घेतले कुसुम बाई...! आमच्या मालवणी काय तुम्हाला करमत नव्हते का...! आजोबाच्या लाडाने नात खळखळून हसली. सर्वांनाही खळखळून हसू आले...! राधिका मावशी, कुसुम, व तिचे बाबा यांनी सगळ्यांचा निरोप घेतला. एसटी बस निघाली. कुसुमने आजोळ सोडले.

स्वतःच्या गावी चिपळूणला जायला निघालेल्या या चिमुकलीला नियतीचा खेळ कुठे माहित होता...! जन्माला येणाऱ्या प्रत्येकाला स्वतःच्या भाग्यरेषा बदलता येत नाही. देवाने लिहून पाठवलेल्या भाग्यरेषा भोगाव्याच लागतात. मात्र त्या भाग्यरेषा माणसाला वाचता आल्या असत्या तर...! स्वतःचे भाग्य अनेकांनी बदवले असते. मालवण वरून चिपळूण सहा तासाचा रस्ता होता. गाडी जशी जोरात धावू लागली, तसा खिडकीतून थंडगार वारा आत येत होता. थंडगार हवेमुळे कुसुमला छान झोप लागली होती. मालवण वरून गाडी निघून चार तास झाले होते. आता दोन तासात चिपळूण येईल...! राधिका आपल्या घरी सगळे कुसुमला भेटायला आतुर झाले आहे. नाव ठेवायला आले होते त्यानंतर पुन्हा कुसुमला पाहण्याचा योग आला नाही. कुसुमचे बाबा व राधिका मावशी बस मध्ये गप्पा मारत होते. बस भरधाव धावत होती. अचानक बसला बिघाड झाली. ड्रायव्हरचे बस वरील

नियंत्रण सुटले व बसचा मोठा अपघात झाला. बसचा अपघात एवढा भीषण होता की, बस मधील जवळजवळ पंचवीस लोकांना स्वतःचा जीव गमवावा लागला. या अपघाताने मात्र कुसुमच्या डोक्यावरचे छत्र हरवले होते. राधिका मावशी व तिचे पती दोघांचे या अपघातात निधन झाले. या भीषण अपघातात मात्र नशिबाने भाग्यवान असणारी कुसुम मात्र सुखरूप बचावली होती. या अपघाताच्या बातमीने मालवण व चिपळूणची सर्व माणसं हादरून गेले होते. नियतीच्या या क्रुर डावापुढे कोणाचेच काही चालत नाही. राधिका मावशी व कुसुमच्या बाबाच्या निधनाच्या बातमीने सर्व नातेवाईक फार हादरून गेले होते. दुःखाच्या अथांग सागरात कुसुमच्या नशिबाची नाव डुबली होती. चार महिन्यापूर्वी, काही तासांपूर्वी नशीबवान, भाग्यवान असणारी कुसुम मात्र नियतीपुढे हरली होती. या अपघाताविषयी सर्व कोकणात हळहळ व्यक्त झाली. कुसुम मात्र सगळयांच्या तोंडी नशीबवान ठरली होती. या भीषण अपघातातून देवाने कुसुमला सुखरूप बचावले होते. हा चमत्कार कसं काय घडला...! ते कुणालाच कळत नव्हते...! आई व बाबाच्या निधनाने पोरकी झालेली कुसुम मालवणी परतली होती.

कुसुमचा सांभाळ आता मामा-मामी करू लागले होते. कुसुम ही राधिका मावशीची आता शेवटची आठवण होती.

आजोळी कुसुम राधिका मावशीची उणीव भरून काढत होती. काळजाचा तुकडा गेल्यामुळे आजी-आजोबांना फार धक्का बसला होता. पण कुसुमकडे बघून थोडे फार दुःख हलके होत होते. आजी-आजोबा, मामा-मामीच्या लाडात कुसुम मोठी होत होती. राधिका मावशीच्या स्वप्नांना आता कुसुमच्या रूपाने पूर्ण करावे लागणार होते. ही जबाबदारी ओळखून कुसुमच्या मामाने कुसुमला छान संस्कार दिले होते. घरातील सर्वांच्या लाडात कुसुम अनेक नवीन नवीन गोष्टी शिकत होती. आजी आजोबांनी तिच्या बालमनावर खूप चांगले संस्कार केले होते. बोलणे, चालणे, वागणे, अशा सर्व गोष्टीत कुसुम सुसंस्कारित झाली होती. कुसुमला बघता बघता सहा वर्षे पूर्ण झाले होते. या वर्षी शाळेत टाकावे लागणार म्हणून कुसुमच्या आजोबांनी गुरुजीशी तसे बोलून पण ठेवले होते. पावसाळा सुरू झाला होता. धो...! धो...! पडणाऱ्या पावसा बरोबरच लहान मुलांना आनंद देणारी शाळाही सुरू झाली होती. कुसुमच्या आजोबांनी शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळेत जाऊन कुसुमचे नाव गुरुजीकडे नोंदवुन दिले. गुरुजींनी कुसुमला नाव विचारून बोलते केले. खूपच गोड मुलगी आहे कुसुम...! हरणे काका अगदी तुमच्यावर गेली नात...! असे म्हणून, " गुरुजींनी कुसुमचे तोंड भरून कौतुक केले.'' खूप हुशार आहे मुलगी...! एक दिवस नाव मोठे करेल तुमचे...! नातीच्या

हुशारीने आजोबांच्या चेहऱ्यावर खूप दिवसांनी का होईना...! पण थोडा आनंद झळकला होता. शाळेत नाव दाखल होताच कुसुमला गुरुजींनी नवीन पुस्तके, पाटी व लेखणी दिली. कुसूम खूप आनंदी झाली होती. आता नियमीत कुसुमची शाळा सुरू झाली. दिवसभर शाळेत नवनवीन गोष्टी शिकायच्या, घरी आले की आजोबांना ते सांगायचे. शाळेत गुरुजी, घरी आजोबा या दोघांच्या शिकवणीने कुसुम लवकरच लिहायला व वाचायला शिकली होती. गणितातही सर्व क्रिया करू लागली. शिक्षणाबरोबरच व्यवहार ज्ञान पक्के झाले होते. घरातील कोणीही कोणतेही काम सांगितले की, कुसुम पळत-पळत काम पूर्ण करायची. स्वतःतील नम्रपणा, बोलण्यातील गोडवा, अभ्यासातील हुशारी यामुळे कुसुम घरीदारी सर्वांची लाडकी कौतुकास पात्र ठरत असे. आईवडिलांची उणीव आतापर्यंत कुसुमला घरच्यांनी भासू दिली नाही. आई वडीला वाचून पोरकी असल्यामुळे तिचे फक्त लाड होत असे. तिच्यावर कधीच कुणी रागवत नसे. कुसुम सुध्दा तशी वेळ कधी येऊच देत नव्हती. बघता बघता कुसुम चौथी पास झाली. वर्गातून प्रथम आली व शिष्यवृत्तीची परीक्षाही पात्र झाली. म्हणून गुरुजींनी हरणे काकांच्या घरी भेट देऊन कुसुमचे कौतुक केले. गुरुजी घरी येऊन कुसुमचे कौतुक करतात. यामुळे कुसुमचा सर्वांना अभिमान वाटला. आजी आजोबा, मामा मामीच्या

संस्काराने व शाळेतील गुरुजीच्या शिक्षणाने कुसुम परिपूर्ण होत होती.

बघता बघता कुसुम एस.एस.सी, एच.एस.सी मध्ये प्रथम आली. कुसुमने आपल्या पहिल्या नंबरची परंपरा कायम ठेवली होती. वयाची अठरा वर्षे पूर्ण झाली. शिक्षण, संस्कार, समजुतदार पणा याबरोबरच सौंदर्यानेही ती अधीक बहरली होती. तारुण्यातील नवचैतन्य तिच्या चेहऱ्यावर झळकत होते. पण मुळात संस्कारी असलेली कुसुम आपल्या वयाने व सौंदर्याने भाळून न जाता या वयातही स्वतःची पायरी ओळखून वागत असे. आतापर्यंतच्या प्रवासात तिने खूप यश मिळवले होते. पण आयुष्यात खुप काही गमावले सुद्धा होते. जन्मानंतर चार महिन्यात आईवडील गमावले होते. त्यांचा चेहरा ही तिला आठवत नव्हता. पुढे दहावीत असतांना ज्यांनी आई-वडीला प्रमाणे सांभाळले ते आजी-आजोबाही एका पाठोपाठ तिला कायमचे सोडून गेले. ती इतरांसाठी नशीबवान वाटत होती. पण स्वतःसाठी मात्र कम नशिबी होती. आता आजी आजोबांच्या पश्च्यात कुसुमची जबाबदारी मामा व मामीवर पडली. मामांनी कुसुमच्या पुढील शिक्षणासाठी रत्नागिरीला चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. व कुसुमच्या लग्नासाठी एखादा चांगला मुलगा शोधणे सुरू केले. आई-वडील व बहिणीच्या मनाला शांती लाभावी असे कुसुम चे थाटामाटात लग्न

करण्याचे मामाने मनाशी पक्के केले होते. स्थळ शोधण्याची मोहीम सुरू झाली अनेक ठिकाणी मामा जाऊन आले. पण त्यांना योग्य असे स्थळ मिळत नव्हते. एके दिवशी कुसुमच्या मामीच्या नातलगातील एका स्थळाचा निरोप आला. मामांनी लगेच दोन चार दिवसात येतो म्हणून निरोप दिला. मामा व त्यांचा सोबती दोघेजण मुलगा बघून आले. मामांना मुलगा खूप आवडला होता. त्यादिवशी मामांनी कुसुमला जवळ बोलावून घेतले. मामा कुसुमला मुलाविषयी सांगू लागले. बघ कुसुम मुलगा कोकणातीलच आहे. खेड जवळच त्याचे छोटेसे गाव आहे. गावावर शेती आहे त्यांचा तिथे मोठा वाडा आहे. काजूच्या व आंब्याच्या खूप मोठ्या बागा आहेत. मुलगा पुण्याला शिकत होता तो आता इंजिनियर होऊन मुंबईला मोठ्या कंपनीत नोकरी करत आहे. मुलगा दिसायलाही खूप सुंदर आहे. त्याचे आई-वडील गावाकडेच राहतात. त्यांना मात्र मुलगी शिकलेली व दिसायलाही सुंदर पाहिजे. लग्नानंतर मुलगा मुलीला मुंबईला सोबत नेणार आहे. त्यामुळे मुलगी शिक्षणा बरोबरच संस्कारित व शहरात अॅडजेस होणारी पाहिजे. त्यांना मी तुझ्याविषयी सर्व खरी खरी माहिती सांगितली. त्यांना स्पष्ट सांगून आलो मुलगी बघतांना तुम्हाला काय विचारायचे ते विचारा. आमची कुसुम लाखात एक आहे. जसा शिंपल्यातील मोती चमकावा तशी ती सर्व ठिकाणी स्वतःच्या

संस्कारांनी चमकत असते. “ माझ्या राधिकाताईच्या काळजाचा तुकडा आहे तो...! ” तुम्हाला नक्कीच आवडेल...! दोन दिवसांनी बघायला येणार आहे असा निरोप पाठवला त्यांनी...! आजच निरोप मिळाला. कुसुम हे ऐकतच मामाच्या समोर बसून होती. तिचे डोळे एकदम भरून आले. लहानपणी आई वडील गेले. निट आईचा चेहरा तिला आठवत नाही. पण आई-वडिलांच्या आठवणीने मात्र ती कधीकधी खूप अस्वस्थ होत असे. मामाने तिला जवळ घेत तिचे डोळे पुसले. वेडी आहेस का तु...? असे रडायला काय झाले. मुलगा नुसता बघायला येतोय...! उद्याच काही घेऊन जाणार नाही. आणि हो...! तसंही मुंबईमध्ये राहायला नशीब लागतंय...! मुंबई काही साध्यासुध्या लोकांचे शहर नाही. येथे राहायला पैसा व ज्ञान दोन्ही लागते. मध्येच मामी म्हणाली, “ आपली कुसुम काय अशिक्षित आहे का? ” ती एवढी शिकली, संस्काराने या कुटुंबात वाढली, कुणाला अशी सुसंस्कारित मुलगी आवडणार नाही. आमच्या कुसुम बाईंना आधी मुलगा तर बघू द्या...! त्यांना आवडला...? तरच पुढचे पुढे बघू...! मुंबईत माणसंच राहतात. यंत्राची पुतळे नाही. कुसुम व मामा दोघेही मोठ्याने हसतात. मामा कुसुमकडे बघून म्हणतात, “ तुझी मामी म्हणजे आपल्या घरची बॉस...! ” ती आपल्या दोघांना बोलण्यात ऐकणार नाही.

पाहुणे येणार म्हणुन मामाने घराची साफसफाई करून घेतली. घरासमोरील बाग, अंगणातील केरकचरा वेचुन घेतला. आजी आजोबा गेल्यापासून घराला घरपण राहिले नव्हते. जणु घरातील नवचैतन्य हरवले होते. आज कितीतरी दिवसांनी संपूर्ण घराची स्वच्छता झाली. आज पाहुणे येणार म्हणून कुसुमने सकाळीच तयारी केली. खेड वरुन पाहुणे आले, त्यांनी कुसुमला बघितले. तिला अनेक प्रश्न विचारले जवळ जवळ एक तास कुसुमची परीक्षा घेतली. कुसुमने मात्र त्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे अचूक दिली. मुलगी पाहण्याचा कार्यक्रम पार पडला. मुलाने जाताजाता कुसुम पसंत असल्याचे सांगून टाकले. पुढील बोलणी तुम्ही माझ्या आई बाबा सोबत करून घ्या. लग्नाचा काय मानपान असेल तो ठरवून घ्या. असे अजयराव यांनी सांगितले. मामांनी व अजयच्या आई-वडिलांनी लग्नाची बोलणी करून लग्नाचा मुहूर्त ठरवला. ठरलेल्या मुहूर्तावर कुसुम व अजयचे थाटामाटात लग्न पार पडले. कुसुम जन्म झाल्यापासून एक दिवस वाडा सोडून गेली होती. त्यानंतर परत ती कधी या वाड्याला सोडून गेली नाही. आज मात्र अजय सोबत कायमची हा वाडा सोडून सासरी निघाली होती. मामांना कुसुमच्या बालपणाची आठवण झाली. मामा मोठ्याने रडू लागले. कुसुमला पोटच्या गोळ्याप्रमाणे जिवापाड जपले होते. कुसुमच्या वीस वर्षाच्या आयुष्यात

कधीही कुसुमला रागवायचे काम पडले नाही. एवढी गुणी व सर्वगुणसंपन्न माझ्या आयुष्यातील मोती मी आज तुम्हाला देत आहे. तिला जीवापाड जपा असे अजय रावांना सांगून मामा पुन्हा रडायला लागले. सर्वांनी जड अंतकरणाने कुसुमला वाटे लावले. सासरी आल्यावर सर्वांशी ओळख झाली. लग्नाचा मानपान सोहळा पार पडला. यात जवळजवळ पंधरा दिवस लोटले होते. अजयच्या सुट्ट्या संपल्या होत्या, त्यामुळे अजय व कुसुम मुंबईला निघून आले. कुसुमने स्वतःचा संसार थाटामाटात उभारला होता. कोकणातील एका छोट्या खेड्यात जन्मलेली ही मुलगी, आई बापा वाचून मामाकडे राहिली. शिक्षण, व संस्काराने नटुन मोठी झाली. आज एवढ्या मोठ्या मुंबई शहरात वास्तवास आली होती. लहान पणापासून हुशार, प्रामाणिक, सुसंस्कारित असल्यामुळे ती मुंबईला सहज रमून गेली. अजय व कुसुम यांचे विचार खूप जुळत होते. कुसुम कोकणातील एका खेड्यातील असूनही विचारांनी व ज्ञानाने पुढारलेली आहे. ती नेहमी आपल्याला प्रत्येक कामात भक्कम साथ देते. नेहमी चांगल्या कामासाठी प्रोत्साहित करते. या सर्व गोष्टीमुळे अजयला तिचा खूप अभिमान वाटत होता. हसत खेळत संसाराची सहा महिने कधी निघुन गेले हे दोघांनाही कळले नाही. अजय काम करत असलेल्या कंपनीला खूप मोठा नफा झाल्यामुळे कंपनीच्या मालकाने मुंबईतील एका मोठ्या

महागड्या हॉटेलमध्ये पार्टी आयोजित केली होती. यासाठी कंपनीतील मोठ्या मोठ्या पदावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहकुटुंब पार्टीचे निमंत्रण दिले होते. अजय सुद्धा या कंपनीत मोठ्या पदावर काम करत होता. त्यामुळे सहकुटुंब पार्टीचे निमंत्रण मिळाले. अजय त्यादिवशी कंपनीतून घरी आल्या आल्या त्यांने ही आनंदाची बातमी कुसुमला सांगितली. तिलाही खूप आनंद झाला. खूप दिवसांनी दोघांना कुठेतरी बाहेर एन्जॉय करता येणार होता. माझा नवरा कंपनीत प्रामाणिक व धडपडीने काम करतो. कंपनीच्या नफ्यात माझ्या नवऱ्याचा वाटा आहेच की...! याशिवाय थोडीच हे निमंत्रण मिळाले...! मी नटून थटून माझ्या नवऱ्या सोबत पार्टीला जाणार आहे. कुसुम आज मोठ्या थाटात बोलत होती. कुसुमबाई साहेब नक्की या...! तुम्ही आम्हाला रोज रोज आनंदाने कंपनीत पाठवता ना...! त्यामुळेच तर कंपनीच्या मालकांनी तुला सुद्धा निमंत्रण दिले. कुसुम चिडुन बोलली. बस आता...! पुरे झाले कौतुक...! हात धुऊन लवकर तयार व्हा. मी जेवायला ताट वाढते.

शेवटी कंपनीच्या कार्यक्रमाचा दिवस उजाडला. आज कंपनीला सुट्टी होती सर्व कर्मचाऱ्यांना सायंकाळी पार्टीच्या ठिकाणी येण्याचे निमंत्रण होते. त्यामुळे अजयराव आज खूप वेळ झोपून होते. रोज मात्र सकाळीच उठून तयारी करावी लागत

असे. वेळेचे सेकंदा सेकंदाला महत्त्व आहे या मुंबईत...! आमच्या कोकणात तासन तास वाया गेला तरी कुणी टेन्शन घेत नाही. ही मुंबई म्हणजे लोकांचा श्वास आहे. इथे कोण झोपते व कोण उठते हे कळतच नाही. मुंबई मात्र चोवीस तास जागीच असते. सायंकाळी मी व अजय छान तयारी करून पार्टीसाठी निघालो. खूप दिवसांनी सायंकाळी नटून थटून आम्ही दोघे बाहेर पडलो होतो. झगमगत्या दुनियेत प्रत्येक जण बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असतो. येथे बाह्यरूपालाच जास्त किंमत आहे. शेवटी आम्ही दोघे जण कंपनीच्या पार्टी मध्ये पोहोचलो. खूप आलेशान महागड्या हॉटेल मध्ये पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वांसाठी बसण्याची, जेवणाची, फोटो काढण्याची, नाचण्याची, गप्पागोष्टी करण्याची सर्व प्रकारच्या व्यवस्था येथे करण्यात आल्या होत्या. माझे व अजयरावांचे नवीन लग्न झालेले असल्यामुळे अनेक जण माझी ओळख विचारत होते. यांच्या कंपनीतील अनेक सहकारी मित्र लग्नाला आलेले नव्हते. त्यामुळे प्रत्येकाला मला बघण्याची उत्सुकता होती. अजय माझी सर्वांशी ओळख करून देत होते. आता पार्टीच्या हॉलमध्ये गर्दी जमली होती. जो तो आपापल्या ओळखीने मित्रांशी सहकुटुंब गप्पा मारत बसले होते. थोड्याच वेळात कंपनीचे मालक सर्वांना मार्गदर्शन करणार होते. अजय मला घेऊन त्याठिकाणी असलेल्या अनेक नविन गोष्टी दाखवत

होता. अचानक माझ्या पायाला काही तरी टोचल्याचे मला भासले. मी खाली वाकून पायाला काय टोचले म्हणून बघितले तर माझ्या पायाजवळ गळ्यातील एक हार पडलेला मला दिसला. मी तो उचलुन हातात घेतला. बघते तर अतिशय सुंदर नक्षी असलेला तो महागडा हार असावा...! कुणीतरी श्रीमंत बाईचा तो असेल...! मी पटकन तो हार अजयजवळ दिला. अजयला कुतूहल वाटले येवढ्या घाईत जो तो एन्जॉय करण्यात व्यस्त आहे. तुला कसा काय? हा हार सापडला...! कुसुम एक मिनिट इथेच थांब...! मी हाराविषयी माईकवरुन जाहीर करतो. कुणाचा असला तर? त्यांना लगेच परत करता येईल. असे म्हणून अजय माईक जवळ गेला. माईक हातात घेऊन सगळ्यांना शांत राहण्याचा त्यानी इशारा केला. हॅलो फ्रेंड्स...! प्लिज एक मिनिट लक्ष द्या. एक महागडा लेडीज हार माझ्या पत्नीला सापडला आहे. कुणाचा असेल तर प्लीज घेऊन जा. हॉलमधील सगळेजण आवाजाच्या दिशेने बघू लागले. तेवढ्यात तेथील एक नोकर पळतच आला. “ साहेब हा हार बाईसाहेबांचा आहे. ” मी एकदम आश्चर्यचकित झालो. कुसुमला चक्क कंपनीच्या मालकाच्या पत्नीचा हार सापडला होता. त्या मॅडमही आमच्या कंपनीत सीईओ म्हणून काम पाहत होत्या. त्यांनी लगेच चौकशी करून मला व कुसुमला स्टेजवर बोलावून घेतले. मॅडमच्या हातात माईक होता. आम्ही दोघेही

स्टेजवर पोहोचलो. मॅडमनी सर्वांना हॅलो नमस्ते...! म्हणून इशारा केला. सगळा हॉल आता शांत झाला होता. मॅडम एकट्याच बोलत होत्या. लक्ष द्या...! आज माझा पन्नास लाखाचा हिऱ्याचा हार दोन तासापूर्वी हरवला होता. कदाचित तो आता पुन्हा सापडणार नाही या चिंतेने मी अस्वस्थ होते. पण काय आश्चर्य आहे?...! तो आपल्या कंपनीच्या अजय साहेबांच्या पत्नीला सापडला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता हा हार परत केला. एवढे प्रामाणिक माणसं आपल्या कंपनीत काम करतात हे आमचे भाग्यच आहे. मी अजय व त्यांच्या पत्नीचे मनापासून स्वागत करते. हिऱ्याच्या हारापेक्षा सुसंस्कारीत मोत्यासारखी अजय व कुसुमच्या रूपाने संस्काराचे दोन मोती आज मिळाले. त्याचा अधिक आनंद मला झाला आहे. माणूस कुठे जन्माला आला याला महत्त्व नाही. शहर, गाव यापेक्षा संस्कार महत्त्वाचे आहेत. कुसुम सारखा संस्काराचा मोती प्रत्येक घरात जन्माला यायला पाहिजे. मी पुन्हा एकदा दोघांचे अभिनंदन करते व त्यांना धन्यवाद देते. आज कुसुममुळे पुन्हा एकदा माझी मान उंचावली होती. ती तिच्या अंगी असलेल्या ‘ संस्काराने ’...! याचा मला खूप आनंद झाला.

# आठ

# यात्रा



रामपूर हे गाव नदीच्या काठावर वसलेले होते. नदीच्या एका किनाऱ्यावर हिरवीगार झाडी बहरली होती. तर दुसऱ्या किनाऱ्यावर रामपुर नावाचं टुमदार गाव उभं होतं. गावातील बहुतेक तरुण शिक्षणासाठी, नोकरीनिमित्त शहरात वास्तवास होते. गाव छोटे असल्यामुळे गावात सर्वांना काम मिळणे शक्य नव्हते. त्यामुळे तरुण पिढी शिक्षणानंतर नोकरीच्या शोधात दोन

वर्षे वाट बघत असे. सरकारी नोकरी नाही मिळाली तर शहरात खासगी कंपनीत नोकरी मिळवत असे. गावातील लोक शेती व्यवसाय करून पोट भरत असे. नदीला पावसाळयात दोन चार पूर गेले की, हिवाळा संपेपर्यंत नदीत पाणी वाहत असे. त्यामुळे शेतीसाठी नदीच्या पाण्याचा वापर होत होता. रामपूरची नदी म्हणजे गावातील सर्वांना देवाची देणगीच होती. शेतात हिरवा भाजीपाला, फळं, कडधान्य, ऊस, कापूस अशा सगळ्या गोष्टी शेतकरी पिकवत असे. रामपूर गावातील भाजीपाला रोजच शहरात जात असे. अन्नधान्य, फळ, भाजीपाला, दूध व पाणी यांनी रामपूर समृद्ध होते. वर्षभर गावातील लोकं कष्ट करण्यात व्यस्त राहत असे. गावात नदीच्या काठावर खंडोबाचे पुरातन सुंदर असे मंदिर होते. गावाचे ग्रामदैवत या मंदिराला समजून गावकरी खंडोबाची भक्ती करत असे. दरवर्षी मार्गशीर्ष महिन्यात चंपाषष्ठीला गावात खंडोबाची मोठी यात्रा भरत असे. रामपुरची खंडोबाची यात्रा पंचक्रोशीत प्रसिद्ध होती. दरवर्षी भरणाऱ्या या यात्रेला गावातील प्रत्येक नोकरदार, तरुण, बाहेरगावी कामानिमित्त असलेले प्रत्येक जण आठवणीने येत असे. गावातील लेकीबाळी, पाहुणे, नातलग, यांना यात्रेचे निमंत्रण आवर्जून जात असे. त्यामुळे यात्रेला सर्व नातलग, गावकरी एकत्र जमत असे. त्याचबरोबर खंडोबाच्या

दर्शनासाठी पंचक्रोशीतील अनेक गावकरी येत होते. आठवडाभर चालणाऱ्या या यात्रेत गर्दीचे स्वरूप प्राप्त होत असे. खंडोबाचे देवस्थान ग्रामदैवत असल्यामुळे गावकरी या यात्रेच्या वेळी खंडोबाची मनोभावे पूजन करत असे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा यात्रा जवळ आली होती. गावातील प्रत्येकाच्या मनात यात्रेविषयीचा आनंद झळकत होता. जशी जशी चंपाषष्टी जवळ येत होती. तसे तसे गावकरी यात्रेच्या प्रतीक्षेत होते. खंडोबा देवस्थानच्या विश्वस्तांनी मंदिराला छान रंगरंगोटी करून घेतली. यात्रा दोन दिवसावर आली होती त्यामुळे मंदिरावर लाइटिंगची रोषणाई करण्यात आली होती. या यात्रेसाठी बाहेरगावावरून वेगवेगळी दुकाने गावात येऊ लागली होती. भंडारा, प्रसाद विकणारी दुकाने, खेळणीची दुकाने, त्याचबरोबर भांडी, कपडे, किराणा अशी सगळ्या वस्तूंची दुकाने या यात्रेत येत असे. रास पाळणा, मोठीमोठी पाळणे, हात बाहुलीचा खेळ करणारी कलाकार, तमाशा कलावंत, वाघे मुरुळी, आदींनी गावाच्या बाहेर नदीकाठी जागा धरून साफसफाईला सुरुवात केली. यात्रा दोन दिवसावर आल्यामुळे बाहेरगावी असणारी मंडळी गावावर येऊ लागली होती. गावाला शहराचे स्वरूप प्राप्त झाले होते. यात्रेसाठी गावातील मुलीबाळी नातेवाईक प्रत्येकाच्या घरी जमू लागली.

खंडोबा देवस्थानच्या विश्वस्त मंडळीने सर्व यात्रेकरूंना जागा उपलब्ध करून दिली. दर वर्षीपेक्षा यावर्षी यात्रा धुमधडाक्यात पार पडली पाहिजे यासाठी सरपंच, पाटील, गावातील प्रतिष्ठित मंडळी यांची बैठक पार पडली. गावात यात्रेच्या सूचना देण्यात आल्या यात्रा जमायला सुरुवात झाली. दोन दिवसात रामपूरची यात्रा भरगच्च भरली होती.

आज चंपाषष्ठीचा दिवस खंडोबाच्या मंदिरातून देवाच्या काठीची मिरवणूक निघत असते. त्यामुळे गावातील प्रत्येक बायकांनी घरासमोर शेणाचा सडा टाकून सुंदर रांगोळी काढली होती. काठीला ओवळण्यासाठी ताट घेऊन बायका आपापल्या घरासमोर उभ्या होत्या. काठीचे दर्शन म्हणजे प्रत्यक्ष खंडोबाचे दर्शन घेण्यासारखे होते. त्यामुळे काठीच्या दर्शनासाठी लोक जमू लागली होती. येळकोट...! येळकोट...! जय मल्हार...! च्या जयघोषात मंदिरातून देवाची काठी निघाली. काहीजण भंडारा उधळत होते तर काहीजण खोबऱ्याचा प्रसाद उधळत होते. वाजत गाजत काठीची मिरवणूक समोर समोर सरकत होती. आजच्या या चंपाषष्ठीच्या दिवशी काठीची मिरवणूक पूर्ण गावातून मिरवूण देवाच्या मंदिरात वापस जाणार होती. चंपाषष्ठीच्या दिवसापासून सुरू झालेली ही यात्रा आठवडाभर

राहत असे. रामपूर गावाची यात्रा म्हणजे एक प्रकारचा सण होता. ऐरव्ही वर्षभर वेगवेगळया सणांच्या पेक्षा यात्रा सर्वांना अधिक आनंद देत असे. हळूहळू यात्रा विनायकच्या घरासमोर आली. विनायक त्याची पत्नी दुर्गा व छोटा मुलगा वैभव तिघांनी काठीचे दर्शन घेतले. दुर्गाने काठीची पूजा केली. वैभवने दोन्ही मुठी भरून भंडारा उधळला. विनायकने मोठ्याने येळकोट...! येळकोट...! जय मल्हार...! असा गजर केला. विनायकने खोबऱ्याच्या प्रसादाची उधळण केली. अनेकांनी गर्दीत पटकन खाली वाकून प्रसाद वेचला. काठीचे दर्शन घेऊन ते गर्दीतून बाहेर आले. आज काठी सोबत मिरवणुकीतील लोकं भंडाऱ्याने पिवळी झाली होती. आज सगळीकडे नुसता भंडारा उधळण सुरू होती. त्यामुळे लोकं, रस्ता, अंगण सगळे पिवळे झाले होते. खंडोबाला भंडारा प्रिय असल्यामुळे सर्व भक्त मनोभावे भंडारा उधळण करत होते मध्येच दुर्गा म्हणाली, ‘‘ अहो मी काय म्हणते...! वैभवला न्या थोड्यावेळ काठीच्या मिरवणुकी सोबत ’’ त्याला यात्रेबद्दल, देवाबद्दल चार नवीन गोष्टी माहिती होईल. ऐरव्ही यात्रा जवळ आल्यापासून तो सारखा यात्रेविषयी मला विचारत होता. आई कधी आहे गं...! चंपाषष्टी. मी यात्रेत जाणार, देवाच्या काठी सोबत गावभर फेरी मारणार, भंडारा उधळणार, खोबऱ्याचा प्रसाद वेचणार.

यात्रेसाठी पार उतावीळ झाला आहे तो...! अग...! लहान आहे तो, लहान मुलांना यात्रेचे कुतूहल असते की, मी लहान असताना मला ही यात्रा म्हटले की खूप आनंद व्हायचा. मी व माझे मित्र आम्ही सर्वजण दिवसभर यात्रेत फिरायचो. काठीच्या मिरवणुकीच्या दिवशी तर आम्ही सगळे भंडाऱ्याने पिवळे होऊन जायचो. संध्याकाळी घरी आल्यावर लवकर ओळखू सुद्धा येत नव्हतो. त्यावेळची मजाच खूप वेगळी होती. विनायक दुर्गाला लहानपणीचा अनुभव सांगत होता. काठीची मिरवणूक आता थोडी पुढे गेली होती. दुर्गा वैभवला घेऊन दारातच उभी होती. विनायक दुर्गाला घरात जायला सांगतो. विनायक वैभवला घेऊन काठी सोबत मिरवणुकीत सामील झाला. वैभव सहा वर्षाचा झाला होता. त्याला आता नेहमी नवीन प्रश्न पडत असे. त्याला प्रश्न पडले की, तो विनायकला विचारत असे. मिरवणुकीत आता गर्दी खूप वाढली होती. त्यामुळे काठी हळू हळू पुढे जात होती. ऐरव्ही मंदिरात दर्शन घेणारी माणसं काठीचे दर्शन घेण्यासाठी मिरवणुकीत गर्दी करू लागली होती. वर्षभर खंडोबाच्या मंदिरात वेगवेगळे उत्सव सुरूच राहत असे. परंतु काठीची मिरवणूक वर्षभरात फक्त चंपाषष्ठीला काढत असे. काठीची मिरवणूक वर्षात एकदाच होत होती त्यामुळे या मिरवणुकीला खूप महत्व होते. आता विनायक व वैभव दोघेही

भंडाऱ्याने भरून गेले होते. पिवळा भंडारा मिरवणुकीत सारखा उधळला जात होता. वैभवने मध्येच वडिलाला प्रश्न विचारला, ‘‘ बाबा मिरवणुकीत भंडारा व खोबऱ्याचा प्रसाद का उधळतात. ’’ अरे बाळा...! अनेकजण खंडोबाला आपल्या अडीअडचणीत नवस करतात. देवाच्या कृपेने मनातील इच्छा पूर्ण झाली तर, चंपाषष्टीच्या दिवशी मिरवणुकीत लोक नवस फेडत असतात. म्हणून भंडारा व खोबऱ्याची खूप एकसारखी उधळण सुरूच असते. शेवटी लोकांना अनुभव आला असेल, मनातील इच्छा पूर्ण होतात तेव्हाच लोक एवढे एकाग्र होऊन भंडारा व खोबऱ्याची उधळण करतात. हळूहळू देवाची काठीची मिरवणूक गावभर फिरून मंदिरात आली. मंदिरात सामुहिक आरती झाली. गावातील पुंजाराम शेठला यावर्षीचा आरतीचा मान मिळाला होता. शेवटी मोठा गजर झाला. येळकोट...! येळकोट...! जय मल्हार...! मंदिराच्या परिसरात भंडाऱ्याची उधळण झाली. शेवटी मंदिराच्या पुजाऱ्यांनी मनसोक्त खोबऱ्याच्या प्रसादाची उधळण केली. उपस्थितांनी खूपच खोबऱ्याचा प्रसाद वेचला. वैभव मोठ्याने म्हणत होता. बाबा...! आपल्याला वेचा खोबऱ्याचा प्रसाद...! बाबा खूप वेचा...! मला खूप आवडतो खोबऱ्याचा प्रसाद...! गर्दीत प्रसाद म्हणून विनायकने दोन खोबऱ्याची तुकडे वेचली. तो वैभवला

घेऊन घरी निघाला. अरे बाळा...! हा देवाचा प्रसाद आहे. प्रसाद कमीच असतो तो खूप खायचा नसतो. आपण उद्या यात्रेमध्ये येऊ तेव्हा तुला खूप सारा खोबऱ्याचा प्रसाद घेऊन देईल. मग तू खुशाल खात बस...! जेवढा पाहिजे तेवढा. वैभव हे ऐकून खूप खुश झाला. अरे वा...! उद्या यात्रेत जायचे. मजाच...! मजा...! येणार. बाबा मी पाळण्यात बसणार आहे बर का? हो...! हो...! धीर धर...! यात्रेत आज जायचे नाही उद्या जायचे आहे. गप्पा मारत मारत दोघेही घरी पोहोचले. ‘‘ वैभव कशी झाली काठीची मिरवणूक, मज्जा आली का बघायला. ’’ वैभव घरी आल्या आल्या दुर्गा त्याला विचारू लागली. हो आई...! खूप मजा आली. मिरवणुकीत केवढी गर्दी होती. मी तर बाबांचा हात सोडलाच नाही. सगळीकडे भंडारा उधळत होते काहीजण तर खूप खोबऱ्याचा प्रसाद उधळत होते. आई माझ्यापेक्षा मोठी मुलं खूप प्रसाद वेचत होती. काही मुलांनी तर खिसे भरून प्रसाद घेतला होता. काठीच्या दर्शनासाठी पण लोकं खूप गर्दीत शिरून दर्शन घ्यायचे. ही सगळी मज्जा मला बघता आली. आज मिरवणुकीत आई...! मी काही वेळ बाबांच्या खांद्यावर बसलो होतो. त्यामुळे मला खूप छान दिसत होते. मंदिरात आरती पण झाली. देवाचा खूप मोठ्याने जयघोष झाला. मी तर मोठ्याने म्हणत होतो. येळकोट...! येळकोट...!

जय मल्हार...! खूप मज्जा आली. बाबांनी तर माझ्यासाठी गर्दीत पण खोबऱ्याचा प्रसाद वेचला. वैभवने पटकन खिशातील दोन खोबऱ्याची तुकडे काढली व दुर्गाच्या हातावर ठेवली. वैभवचे बोलणे विनायक व दुर्गा कुतुहलाने ऐकत होते. यावर्षीची यात्रा वैभवमुळे अधिकच मजेत जाणार होती. दुर्गा हसत...! हसत...! म्हणाली, चला हात पाय धुऊन घ्या. देवाला नैवेद्य दाखवा व गरम गरम जेवून घ्या. आज देवाला वरण पोळी वांग्याचे भरीत असा नैवेद्य दाखवून दोघेपण मनसोक्त जेवण करत बसली. रामपूरची यात्रा भरगच्च भरली होती. गावाला जणू शहराचे रूप आले होते. गावात येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या खूप वाढली होती. म्हणता म्हणता यात्रेचे दोन दिवस निघून गेले. दुर्गा हळूच म्हणते, ‘‘ अहो आपल्याला कधी जायचे यात्रेत ’’ वैभव दोन दिवसापासून माझ्या मागे लागला. तुम्ही ऑफिसला गेले की, तो मला सारखा यात्रेत घेऊन चल म्हणतो. बरं...! जाऊ उद्या...! तुला पण घाई झाली असेलच की, यात्रेत जायची. लहान मुलांन ऐवढाच आनंद होतो तुम्हा बायकांना...! यात्रा म्हटले की...! विनायकच्या बोलण्याने दुर्गा लाजत...! लाजत...! आतल्या खोलीत निघून गेली. चला आता शांत झोपा. उद्या जाऊ यात्रेत, मी उद्याची सुट्टी काढली आहे. उद्या दिवसभर यात्रेत फिरूया...! तुम्हाला यात्रेत काय

मज्जा करायची ती करा. असे म्हणून, लाईट बंद करून सगळेजण झोपी जातात.

आज सकाळी उठून दुर्गा लवकर लवकर कामे आटपून तयार होते. वैभवला लवकर उठवुन त्याची सुद्धा तयारी करून देते. तिघेही यात्रेमध्ये जायला निघतात. आज गावातील अनेक जण सहकुटुंब यात्रेमध्ये आलेले होते. काहीजण तर खूप दिवसांनी रामपूरला आले होते. यात्रेच्या निमित्ताने का होईना पण बालपणीचे मित्र यात्रेत भेटत होते. सहकुटुंब ओळख होत होती. यात्रेत अनेक वेगवेगळी दुकाने आली होती. लोकं आपापल्या गरजेनुसार वस्तू घेण्यात व्यस्त होती. वैभव मधेच म्हणाला, ‘‘ बाबा...! बाबा...! तो पहा पाळणा मला त्यात बसायचे आहे. ’’ चला...! पटकन तिकडे. वैभवच्या आनंदासाठी दुर्गा, विनायक पाळण्यात बसतात. खूप उंचच उंच पाळणा होता तो...! पाळणा वरती गेला की, सगळे रामपूर दिसायचे. नदी, गाव, मंदिर व मोकळ्या जागेत भरलेली मोठी यात्रा स्पष्ट दिसत होती. पाळणा खूप वेगात आल्यावर तर दुर्गांनी डोळे लावून घेतले. तिला भीती वाटू लागली होती. वैभव मात्र मोठ्या मोठ्याने ओरडत पाळण्याचा आनंद घेत होता. शेवटी पाळणा खेळून झाला. तिथले अनेक छोटी छोटी

पाळणे वैभवला खेळु दिली. लहान मुलांना पाळणा खेळण्याचा खूपच आनंद असतो. वैभवच्या त्या आनंदाने विनायकला बालपणाची आठवण करून दिली. मी लहान असताना आठही दिवस मित्रांसोबत यात्रेत फिरायचो. परिस्थिती गरिबीची असल्यामुळे घरचे पैसे देऊ शकत नव्हते. त्यामुळे यात्रेत काही खाणेपिणे, खेळणी घेणे, पाळणा खेळणे, या गोष्टी शक्य होत नव्हत्या. त्यामुळे रिकाम्या खिशाने दिवसभर यात्रेत फिरायचे. डोळ्यांनी मन भरून यात्रेतील प्रत्येक गोष्ट कुतूहलाने पाहायची. आठ दिवसात यात्रेतील प्रत्येक दुकान, प्रत्येक गोष्ट रोज मी बघायचो. यात्रा म्हणजे दिवसभर फिरायचे, घरी येऊन जेऊन झोपायचे. हा नित्यक्रम खुप आनंद देत होता. पण त्या वेळचा आनंद आज कितीही पैसे खर्च केले तरी मिळणार नव्हता. बालपण ते बालपणच असते. विनायक बालपणाच्या आठवणीत हरवून गेला होता. दुर्गा हळूच म्हणते, ‘‘ अहो...! ऐकलत का, मी केव्हापासून तुम्हाला आवाज देते. ’’ तुमचे लक्ष कुठे आहे. आपल्याला देव घरात ठेवण्यासाठी एक छान समई घेऊ का? बघाना किती छान पितळी समया आहेत. विनायक गालातल्या गालात हसून म्हणतो, ‘‘ अग...! तुला आवडली असेल तर घे ’’ दुर्गा ने एक छान पितळी समई विकत घेतली. पुढे यात्रेत फिरत फिरत खेळण्याच्या दुकानाची लाईन

सुरु झाली. वैभव नाचत उड्या मारू लागला. बापरे...! केवढी मोठी मोठी खेळणी...! अरे...! वा...! रिमोट वरची गाडी पण आहे. बाबा...! चला लवकर मला खेळणी घेऊन द्या. मी रिमोटची गाडी घेणार. विनायक वैभवला घेऊन एका खेळण्याच्या दुकानात थांबतो. अरे...! अगोदर दुरूनच खेळणी बघून घे, तुला नेमकी जी खेळणी आवडली असेल तीच घेऊया. दुकानात सगळीच खेळणी छान आहे. मग काय सगळे दुकान घ्यायचे का? तू सांग...! वैभव कधी रिमोट गाडीला हात लावायचा. तर कधी हवेचा मोठा चेंडू, तर कधी हवेत उडणारे विमान, तर कधी वाजणारे डमरू, एकदम ऐवढी खेळणी बघून त्याला काय घ्यावे काहीच सुचत नव्हते. शेवटी खूप वेळाने त्या दुकानात रिमोटची गाडी घेतली. पुढे चालता चालता वैभव पुन्हा म्हणतो, ‘‘ बाबा तुम्ही मला एक खेळणी घेऊन दिली, आता आई मला एक खेळणी घेऊन देईल ’’ मी आई कडून परत एक खेळणी घेणार म्हणजे घेणारच...! बरं....! तुझ्या आईकडून पण एक खेळणी घे. पण परत काही घ्यायचे म्हणू नको. खूप सारी खेळणी एकदाच घेऊन तू एकावेळी खेळू शकतील का? नाही ना....! मग कशाला खूप खेळणी...! असे म्हणून विनायक वैभवला घेऊन परत एका खेळण्यांच्या दुकानात जातो. तिथे खेळणी पहात असताना एक स्त्री विनायक

कडे बघत....! बघत...! अरे विनायक कसा आहेस. ओळखले का? विनायक एकदम त्या स्त्री कडे बघून विचारात पडतो. अरे...! मी प्रिया...! माने गुरुजींची मुलगी. हो...! हो...! प्रिया आता ओळखले. अग...! किती दिवसानंतर आपण भेटतोय. कसे ओळखणार...! लहानपणी आपण शाळेत होतो. सातवी नंतर तुझी माझी भेटच नाही. अरे हो...! माझ्या बाबांची बदली झाली. त्यानंतर आम्ही रामपूर सोडून गेलो. त्यानंतर माझे पुढचे शिक्षण ही तिकडेच झाले. त्यानंतर बाबांनी माझे लग्न करून दिले. लग्नानंतर मी पुण्याला राहायला गेले. त्या सगळया घाईत रामपूरला येण्याचा कधी योग आलाच नाही. हे माझे मिस्टर सुशांत...! पुण्यात अभियंता आहेत. नमस्कार साहेब...! मी विनायक पोस्ट ऑफिस मध्ये नोकरीला आहे. ही माझी बायको दुर्गा...! व हा माझा मुलगा वैभव...! प्रिया व मी पहिली ते सातवी एकाच वर्गात शिकलो. ती आमच्याच गल्लीत राहत होती. आम्ही लहानपणी चांगले मित्र होतो. पुढे तिच्या वडिलांच्या बदलीमुळे ते रामपूर सोडून गेले. त्यानंतर कधी भेट झालीच नाही. त्यानंतर यात्रेमुळे आज भेटण्याचा योग आला. विनायक हळुच विचारतो. काका काकू कसे आहेत. छान...! आहेत. माझे बाबा आता निवृत्त झाले. त्यामुळे आई बाबा दोघेही आमच्या मूळ गावी राहतात. प्रिया म्हणाली, ‘‘ तुझे

आई बाबा कसे आहेत. '' ते पण छान आहेत. माझी छोटी बहिण मुंबईला राहते. तिला छोटे बाळ आहे. त्यामुळे आई-बाबा गेल्या काही दिवसापासून तिच्याकडेच गेलेले आहे. ताईचे बाळ छोटे आहे ना...! त्यामुळे आई-बाबा यात्रेला सुद्धा नाही आले यावर्षी. हो...! का...! त्यांना सांगशील प्रिया भेटली होती. तुमच्याबद्दल विचारत होती. हो...! हो...! नक्की सांगतो. मला शिक्षणानंतर पोस्टात नोकरी मिळाली. योगायोगाने माझी गावाजवळच बदली झाली. त्यामुळे मी रामपूरलाच राहतो. हो...! का...! अरे वा छान...! झाले. वहिनीला घेऊन ये...! पुण्याला एकदा...! माझ्याकडे, दोन चार दिवस राहा. गप्पा-टप्पा होईल पुण्यात फिरता येईल. बघू...! कधी तरी...! योग आला की, येईल नक्की. विनायक मान हलवुन प्रियाला होकार देत होता. प्रिया जाताना ये घरी साहेबांना घेऊन. वाटल्यास थांबून जा आजच्या दिवस....! उद्या परत यात्रेत फिरता येईल. अरे...! विनायक थांबता नाही येणार. आम्ही आजच रात्री पुण्याला वापस निघतोय. यांना सुट्टी नाही त्यामुळे जावेच लागेल. पण येतांना चहा घ्यायला नक्की येतो घरी. असे म्हणून प्रिया व तिचे पती तिथून निघून जातात.

विनायक दुर्गाला सांगतो. अग...! प्रियाचे बाबा आपल्या रामपूरच्या शाळेत शिक्षक होते. त्यामुळे ते येथेच राहत होते. आपल्या घराच्या बाजूलाच दोन घरं सोडून ते तिथे किरायाने राहत होते. प्रिया लहानपणी तिच्या आई सोबत आपल्या घरी नेहमी येत असे. आम्ही लहानपणी एकत्रच खेळायचो. लहानपणी आमची खुप खुप गट्टी जमायची. आम्ही खूप चांगले मित्र होतो. पण पुढे बदलीमुळे ते रामपूर सोडून गेले. यामुळे प्रियाला व गुरुजींना भेटण्याचा योग आला नाही. पण तुझ्या एक लक्षात आले का...! तिच्या बाबाने तीला या यात्रेच्या निमित्ताने खंडोबाच्या दर्शनाला पाठवले. गुरुजी नियमित मंदिरात जायचे ते खंडोबाचे खूप भक्त होते. गुरुजी आमच्या शाळेची कधी कधी सहल मंदिरात घेऊन जात असे. आम्ही सर्व मुलं दर्शन घेऊन मंदिराच्या बाहेरच्या मोकळया पटांगणात बसायचो. गुरुजी आम्हाला देवाच्या विषयी माहिती सांगायचे. प्रियाचे वडील अतिशय शिस्तप्रिय व कडक स्वभावाचे होते. आम्ही त्यांना खूप घाबरायचो. मुले गल्लीत खेळत असले व समोरून गुरुजी आले की, सगळी मुले एका क्षणात गायब होऊन जायचे. ऐवढी आदरयुक्त गुरुजीची भीती होती सर्वांना त्यामुळेच तर रामपुरची अनेक मुलं घडली. मला पण गुरुजीच्या शिकवणीमुळे नोकरी मिळाली. आता एक दिवस नक्कीच...!

प्रियाच्या मूळ गावी जाऊन गुरुजीची भेट घेऊ या...! त्यांनाही खूप आनंद होईल. आपल्या रामपूर बद्दल गुरुजी कुतूहलाने सारी विचारपूस करतील. गप्पा मारत मारत यात्रा फिरून झाली. वैभवला खेळणी घेतली. दुर्गाला घरात लागणाऱ्या काही वस्तू घेतल्या. आज दिवसभर यात्रेत फिरून कंटाळा आला होता. भूक पण लागली होती. आम्ही एका मिठाईच्या दुकानात जाऊन गरम गरम जिलेबी खाल्ली. तिखट चिवडा व जिलेबीचा पोटभर अस्वाद घेतला. यात्रेतील जिलेबी व चिवडा म्हणजे फेमस पदार्थ होय. यात्रेतील जिलेबीची चव वर्षात एकदा चाखायला मिळते. वैभवसाठी घरी जाताना भरपूर खोबऱ्याचा प्रसाद घेतला. आम्ही घरी निघालो. दुर्गा मध्येच म्हणाली, ‘‘ अहो तुमच्यासाठी काहीच घेतले नाही यात्रेत आपण ’’ मी हसत म्हणालो, ‘‘ मी वैभव सारखा छोटा आहे का...! खेळणी वगैरे घ्यायला. ’’ अहो...! असे नाही. पण काही महत्त्वाची एखादी अशी वस्तू घेतली असती बघा...! माझ्याच डोक्यात आले नाही. अग...! मी तुमच्या चेहऱ्यावरचा मन भरून आनंद घेतला. मला यातच समाधान वाटले. यात्रेत अनेक मित्र भेटले, प्रिया भेटली, या माणसांना भेटण्याचा आनंद मला बालपणीची यात्रा करून गेला. बोलत बोलत आम्ही घरी पोहोचलो. घरी येताच वैभवने रिमोटच्या गाडीत सेल टाकून गाडी खेळणे सुरू

केले. गाडी खेळता-खेळता वैभव म्हणतो, ‘‘ बाबा यात्रा संपण्याच्या अगोदर पुन्हा एकदा जाऊ या, यात्रेत मजा करायला. ’’ बघूया वेळ मिळाला तर नक्की जाऊ. असे म्हणून मी अंग टाकले. दुर्गा पाण्याचा ग्लास घेऊन आली. मी पाणी पित दुर्गाला सांगु लागलो. माणसाच्या जीवनात पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा खूप वाढते. पण समूहातील आनंद हा या सगळ्यापेक्षा अधिक समाधान देऊन जातो. माणसाचे आयुष्य हे यात्रे सारखेच भरगच्च सजलेले व सर्वांना आनंद वाटणारे असावे.

# || समाप्त ||

ई साहित्य प्रतिष्ठान कडुन याआधी प्रकाशित झालेले पुस्तक

राजेंद्र शेळके लिखित ‘**विचारांची श्रीमंती**’

**कव्हरवर एक क्लिक करताच उघडेल**



मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.



मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वत:ही लिहायला हवं.

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com